सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## जे लोक चारा खातात, ते कधीच परिस्थिती बदलू शकत नाहीत पंतप्रधान मोदींचा लालू प्रसाद यादवांवर 'वार'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ भागलपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पुन्हा एकदा चारा घोटाळ्यावरून लालू प्रसाद यादव यांच्यावर टीकास्त्र डागले. भागलपूर येथे झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान किसान सन्मान निधीचा १९वा हफ्ता जमा करण्यात आला. यावेळी संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी नितीश कुमार यांचा लाडका मुख्यमंत्री म्हणून उल्लेख केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, भारताचे कृषी निर्यात वेगाने वाढत आहेत. शेतकऱ्यांच्या शेतमालाला आता जास्त किंमत मिळत आहे. आता बिहारला मखाना उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे. भागलपूरच्या विणकरांना आम्ही सुविधा देऊ. कापड उद्योगही आम्ही पुढे नेत आहोत. रेशीम उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

लालू प्रसाद यादव यांचं नाव न घेता पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, काही लोक तर जनावरांचा चाराही खाऊन टाकतात.



जे चारा खातात, ते कधीच परिस्थिती बदलू शकत नाहीत. एनडीए शेतकऱ्यांच्या विकासासाठी वचनबद्ध आहे. मी नेहमी असे मानतो की, गरीब, अन्नदाता, तरुण आणि महिला हे लोकशाहीचे चार स्तंभ आहेत, असे मोदी म्हणाले.

पूर्वी छोट्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. एनडीएचे सरकार नसते तर शेतकऱ्यांना सन्मान निधीही मिळाला नसता. एनडीए सरकारने शेतकऱ्यांची परिस्थिती बदलली आहे. आम्ही नुकसान होणार नाही, यासाठी उपाय योजना केल्या आहेत. काँग्रेसला शेतकऱ्यांचं महत्त्व नाही. त्याच्या सरकारमध्ये मच्छिमारांनाही लाभ मिळत नव्हता, अशी टीका मोदींनी केली. आता मखाना बोर्ड लवकरच स्थापित केले जाणार आहे. त्यामुळे बिहारमधील शेतकऱ्यांना लाभ होईल. वर्षातील ३०० दिवस मी सुद्धा मखाना खातो. आता बिहारमधील मखानाला पुढे नेण्याची वेळ आहे. बिहारचा प्राचीन गौरव आम्ही परत आणू. पूर्वोदयाकडूनच विकसित भारताच्या उदय होईल, असेही मोदी यावेळी म्हणाले.

## जास्त मस्ती कराल तर घरी जाल; मुख्यमंत्री फडणवीसांनी दम दिल्याची माणिकराव कोकाटेंची कबुली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पुणे**

तुमच्या जाण्याने सरकारवर काहीही परिणाम होणार नाही, अगदी माझ्या जाण्यानेही नाही. त्यामुळे जास्त मस्ती कराल तर घरी जाल, असा दमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिपदाचा कारभार हाती घेतल्यानंतर पहिल्याच बैठकीत दिला होता, अशी कबुली कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. आमचे खासगी सचिव, विशेष कार्य अधिकारीही मुख्यमंत्रीच ठरवतात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बाजार समित्यांच्या राज्यस्तरीय परिषदेत ते बोलत होते. यावेळी पणनमंत्री जयकुमार रावल, आमदार दिलीप बनकर, अनुराधा चव्हाण, माजी खासदार देविदास पिंगळे, सहकार आयुक्त दीपक तावरे, पणन संचालक




विकास रसाळ, पुणे बाजार समितीचे सभापती दिलीप काळभोर, राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम उपस्थित होते.जनतेच्या आशीर्वादाने राज्यात बहुमताचे सरकार स्थापन झाल्याचे सांगून कोकाटे यांनी शिवसेनेच्या शिंदे गटाचे नाव न घेता कुणाच्याही जाण्याने सरकारला धोका नसल्याचे अप्रत्यक्षरीत्या जाहीर केले.विभागाचे काम शिस्तीत झाले पाहिजे, असे सांगून मुख्यमंत्र्यांनी १०० दिवसांचा कार्यक्रमच दिला आहे. त्यानुसार काम करायचे आहे, असे कोकाटे म्हणाले. आता आमचे खासगी सचिव, विशेष कार्य अधिकारीही मुख्यमंत्रीच ठरवतात, असे स्पष्ट करून आमच्या हातात आता काहीही राहिले नसल्याची कबुलीही त्यांनी दिली. त्यामुळे आता आम्हाला काम करावेच लागेल. पण पणन मंडळाच्या अधिकाऱ्यांनीही चांगले काम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला. राज्य अधिकाऱ्यांनी सरकारसोबत नीट सांगड घालून काम केल्यास राज्यात स्थैर्य व शाश्वती निर्माण होईल. त्यातून विकासाकडे जाता येईल, असेही ते म्हणाले. त्यामुळे मी बाजार समित्यांना कमी लेखत नाही. याच समित्यांमुळे अनेकजण आमदार, खासदार झाले आहेत. राजकारणात उद्याचे भविष्य तुमच्या हातात आहे, असे बाजार समित्यांच्या पदाधिकाऱ्यांना संबोधून सरकार निर्माण करण्याचे काम समित्या करत असल्याचे ते म्हणाले. तुमच्यात क्षमता असून, ती कामाला लावून जास्तीत जास्त लोकाभमिमुख काम करा, असा सल्लाही त्यांनी दिला.

## आम्ही खोलात गेलो, तर मुश्किल होईल; नीलम गोऱ्हेंवर राऊतांनी केलेल्या पलटवारावर शिरसाठांचा वार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४मुंबई**

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वक्तव्यानंतर राजकीय वादळ उठलं आहे. त्यावर शिवसेना ठाकरे गटातून तुफान पलटवारर झाल्यानंतर आता शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाठ मैदानात उतरले आहेत. त्यांनीही तुम्ही कुणाकडून आणि किती पैशे घेता असा थेट घणाघात केलाय.



शिरसाठ म्हणाले, माझ्या जिल्ह्यापुरतं सांगतो. माझ्या विरोधात उमेदवार दिला. पक्षाचा एक निष्ठ असलेला कार्यकर्ता आठ दिवसांचा. आठ दिवसाच्या माणसाला तुम्ही तिकीट देता. मग तमुचे शिवसैनिक कुठं गेले होत, जे २०-२५ वर्षांपासून तुमच्यासोबत काम करतायत. त्यांना तिकीट का नाकारलं? आज विचारा त्यांना तो माणसू कुठे आहे. वैजापूरमध्ये बोरनारांच्या विरोधात माणूस दिला होता. व्यापारी माणूस निवडणूक लढवली तो आता भाजपात का गेला असाही प्रश्न शिरसाठांनी विचारला?

सिल्लोडचा उमेदवार जो भाजपत होता. निवडणुकीच्या काळात तुमच्याकडे आला, निवडणूक झाली, तो भाजपात का गेला? पैठणचा उमेदवार तो कुठे आहे? विचारा त्यांना अशी टीका मंत्री आणि आमदार संजय शिरसाट यांनी केली. ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्यावर पद मिळतं असा आरोप नीलम गोऱ्हे यांनी केला. त्यावरुन सुरु असलेल्या राजकारणावर संजय शिरसाट यांनी ठाकरेंच्या शिवसेनेचा पाडाच वाचला.

मराठवाड्यात अनेक ठिकाणी पैसे घेतले, तिकीटं वाटली, त्याचा परिणाम असा झाला की, जे शिवसैनिक अहो-रात्र काम करतात, ते बाजूला पडले. यात दलालांनी उखळ पांढर करुन घेतलं. म्हणून कोणी काय केलय त्यापेक्षा तुम्ही काय करताय त्याचं एकदा स्पष्टीकरण द्या असा थेट आसूडच शिरसाठांनी मारलाय. एकनाथ शिंदे बोलतील, त्या दिवशी तुम्हाला कळेल कसे आणि कुठे-कुठे पैसे घेतलेत. या सगळ्यावर बाजू मांडताना आम्हाला सुद्धा त्रास होतो. आम्ही अभिमानाने आणि गर्वाने सांगतो की, शिवसेनाप्रमुख निवडणूक लढवताना विचाराचये बाळा तुझ्याकडे पसे आहेत का, काही मदत लागेल का? मात्र, आता तिकीटासाठी पक्षाला किती पैसे देणार? म्हणून विचारणारे तयार झालेत असा टोलाही त्यांनी लगावला.

**तर मुश्किल होईल**

गडाख त्यांच्या मंत्रिमंडळात तीन-चार मंत्री झाले, त्यांना विचारा. त्यांच्या वाढदिवसाला हे जायचे. आम्ही ४० वर्ष काम केलं, पण आम्हाला वाढदिवसाला साधा फोन नाही आणि यांच्या वाढदिवसाला चार्टड घेऊन जायचे असा आरोप संजय शिरसाट यांनी केला. त्या बाईच्या घरावर काही महिला पाठवून मर्दानगी दाखवता का? तुम्ही स्वत:ला मर्द समजता का?. एक महिला काय बोलली, तिच्यावर तुटून पडता. आम्हाला बोलायला लावू नका. आम्ही खोलात गेलो, तर मुश्किल होईल असा इशाराही संजय शिरसाट यांनी दिला आहे.

**कोण असत तोडबाजीला?**

कॉर्पोरेशनचे व्यवहार कसे होतात? कुठल्या हॉटेलमध्ये होतात, कोण-कोण असत तोडबाजीला? या सगळ्या गोष्टी सर्वांना माहितीये. आरोप करायला काही लागत नाही. जे सत्य आहे, ते सर्वांना मान्य करावं लागेल. आजच्या घडीला जे काय चाललय, त्यामुळे तुमचा पक्ष रसातळाला गेलाय. काल आलेला माणूस नेता होऊ शकतो, त्याला तिकीट मिळतं. पण जो शिवसैनिक तुमच्यासोबत आहे त्याला तुम्ही तिकीट देऊ शकत नाहीत अशी खंत संजय शिरसाट यांनी व्यक्त केली.

## वादग्रस्त सीमाभाग तत्काळ महाराष्ट्रात सामील करावा दिल्लीतील साहित्य संमेलनात १२ ठराव संमत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नवी दिल्ली**

दिल्लीत झालेल्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा समारोप झाला. तालकटोरा स्टेडिअममध्ये संमेलनाच्या समारोप सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, लोकमतच्या एडिटोरियल बोर्डचे चेअरमन व माजी खासदार डॉ. विजय दर्डा, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या साहित्य संमेलनात १२ ठराव संमत करण्यात आले.



मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील अनेक बोली भाषा अस्तंगत होत असल्याने त्यांच्या संवर्धनासाठी राज्य शासनाने बोली भाषा विकास अकादमी स्थापन करावी, विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांमध्ये बोली भाषांचा समावेश करावा, तसेच, संत गाडगेबाबा जयंती म्हणजेच २३ फेब्रुवारी हा दिवस बोली भाषा दिन म्हणून साजरा केला जावा, अशी मागणी करणारा ठराव ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात संमत करण्यात आला. संमेलनाच्या समारोप सत्रात विविध विषयांवरील एकूण १२ ठराव मांडून ते संमत करण्यात आले.

**वादग्रस्त सीमाभाग तत्काळ महाराष्ट्रात सामील करावा**

वादग्रस्त सीमा भाग केंद्र शासनाने तत्काळ महाराष्ट्रात सामील करावा. महाराष्ट्रासह बृहन्महाराष्ट्रातील ग्रंथालयांना ऊर्जितावस्था यावी, यासाठी शासनाने सर्वतोपरी प्रयत्न करावे. बृहन्महाराष्ट्रातील मराठी संस्थांना विशेष दर्जा देत नियमित वार्षिक अर्थसहाय्य मंजूर करावे. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाने मराठी भाषेचे अध्यासन केंद्र सुरू करावे. कोणत्याही कारणास्तव राज्यातील अनुदानित वा विनाअनुदानित मराठी आणि सेमी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये रूपांतर केले जाणार नाही यासाठी शासनाने प्रयत्न करावा. गोव्यात राज्य कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षेत कोंकणी भाषा अनिवार्य करणे म्हणजेच सहभाषा मराठीला टाळणे हे अन्यायकारक आहे. याबाबत केंद्र सरकारने मराठीवरील अन्याय दूर करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही**

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन हे राज्यपाल, मंत्री, आमदार आणि खासदारांसाठी आहे. मात्र, महाराष्ट्र सरकार मराठी माणसांसाठी नवी दिल्लीत भव्य सांस्कृतिक भवन उभारणार असून त्यासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद केली जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी बोलताना केली. तसेच मराठीला अभिजात वैभव प्राप्त करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. मराठी ज्ञानभाषा व्हावी, मराठीची उपयुक्तता वाढावी, ती बहुजात आणि बहुज्ञात व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी, प्रसारासाठी शासन निधी कमी पडू देणार नाही, असेही अजित पवार म्हणाले.

## केसगळतीपाठोपाठ बुलढाण्यावर आता नवे संकट, आठ वर्षीय बालकाला 'जीबीएस'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४बुलढाणा :**

राष्ट्रीय स्तरावरील आरोग्य यंत्रणासाठी कडवे आव्हान ठरलेल्या केसगळती व टक्कल आजाराचा धोका अजूनही टळला नसताना जिल्ह्यात आता 'जीबीएस ' चा पहिला रुग्ण आढळून आला आहे. यामुळे नागरिकांसह आरोग्य यंत्रणात खळबळ उडाली आहे.

राज्यात अनेक ठिकाणी प्रामुख्याने पुणे सारख्या महानगरात जीबीएस अर्थात 'गुलियन बॅरी सिंड्रोम' चे रुग्ण मोठ्या संख्येने आढळून आले आहे. राज्यात या विचित्र आजारामुळे मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या देखील लक्षणीय आहे. अमरावती विभागात प्रामुख्याने शेजारील अकोला जिल्ह्यात काही दिवसापूर्वी जीबीएस ने शिरकाव केला होता. यामुळे नजिकच्या बुलढाणा जिल्ह्यात या आजाराचा शिरकाव होण्याची शक्यता वर्तविण्यात आली. ही धास्तीवजा शक्यता दुर्दैवाने खरी ठरली आहे.

राज्यात अनेक ठिकाणी प्रामुख्याने पुणे सारख्या महानगरात जीबीएस अर्थात 'गुलियन बॅरी सिंड्रोम' चे रुग्ण मोठ्या संख्येने आढळून आले आहे. राज्यात या विचित्र आजारामुळे मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या देखील लक्षणीय आहे. अमरावती विभागात प्रामुख्याने शेजारील अकोला जिल्ह्यात काही दिवसापूर्वी जीबीएस ने शिरकाव केला होता. यामुळे नजिकच्या बुलढाणा जिल्ह्यात या आजाराचा शिरकाव होण्याची शक्यता वर्तविण्यात आली. ही धास्तीवजा शक्यता दुर्दैवाने खरी ठरली आहे.

या पार्श्वभूमीवर आता बुलढाणा जिल्ह्यात या आजाराचा रुग्ण आढळून आला आहे. जिल्ह्याच्या सीमावर्ती आणि माध्य प्रदेश राज्याच्या सीमेला लागून असलेल्या जळगाव जामोद तालुक्यात या आजाराचा रुग्ण आढळून आला आहे. खेर्डा बुद्रुक या गावातील साडे आठ वर्षाच्या बालकाला जीबीस ची लागण झाल्याचे आढळून आले आहे. त्याला उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे. अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात येत आहे.

आरोग्य विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी याला दुजोरा दिला. या बाधित बालकावर अकोला येथे उपचार करण्यात येत असल्याचे या सूत्रांनी सांगितले.

## शैक्षणिक वर्ष सुरू होणार जूनपासूनच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २४ मुंबई :**

यंदाचे शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून नव्हे, तर जूनपासूनच सुरू होणार आहे. सोबतच सीबीएसईच्या धर्तीवर यंदापासून पहिलीचा अभ्यासक्रम तयार केला जात असून त्यासंदर्भातील अंमलबजावणी होणार असल्याची महिती शालेय शिक्षण विभाकडून देण्यात आली आहे.

नव्या शैक्षणिक वर्षात राज्य शिक्षण मंडळाच्या शाळाही सीबीएसईच्या धर्तीवर एक एप्रिलपासून सुरू होणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर शिक्षक, शाळा व्यवस्थापन आणि विद्यार्थी यांच्यात संभ्रम निर्माण झाला. याला राज्यातील शिक्षकांनी आता तातडीने हे कसे शक्य आहे, असे सांगत नाराजी व्यक्त केली.यावर शालेय शिक्षण विभागाने केलेल्या खुलाशानुसार शैक्षणिक वर्ष जूनपासूनच सुरू होणार असून केवळ नव्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांना राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. या अभ्यासक्रमाची आखणी सीबीएसईच्या धर्तीवर केली असून हा बदल वगळता शाळांच्या वेळापत्रकात काहीही बदल झालेला नाही.याबाबत राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शाळांच्या वेळापत्रकात यंदा तरी असा कोणताही बदल होणार नसल्याचे स्पष्ट केले. शिक्षण विभागाच्या राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे पहिली आणि शक्य झाल्यास इयत्ता दुसरीसाठी एनईपी लागू करणे म्हणजेच राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवी पुस्तके आणि बदललेल्या पद्धतीने शिक्षण देणे हा बदल होणार आहे. तथापि, शाळा नेहमीप्रमाणे जून महिन्यातच सुरू होतील, असे सिंह यांनी स्पष्ट केले.

## 'काँग्रेस' हिंदुद्वेषी अन् मुस्लिम लीगची बी टीम; राहुल गांधींचं हिंदुत्व काढत राणे बरसले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अहिल्यानगर**

काँग्रेस हा हिंदुद्वेषी पक्ष असून मुस्लिम लीगची बी टीम आहे, या शब्दांत मत्स्य आणि बंदर मंत्री नितेश राणे जोरदार बरसले आहेत. यावेळी बोलताना राणे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं हिंदुत्व काढत जहरी टीका केलीयं. राहुल गांधी यांना कधी कुंभमेळ्यात स्नान करताना पाहिलंय का? असा थेट सवाल राणे यांनी राहुल गांधी यांना केलायं.

पुढे बोलताना नितेश राणे म्हणाले, काँग्रेस हिंदुद्वेषी पक्ष असून मुस्लिम लीगचीच बी टीम आहे. राहुल गांधी यांना कधी स्नान करताना पाहिलंय का? त्यामुळे आता विजय वडेट्टीवारांकडून काय अपेक्षा करणार, दुसरी अपेक्षा आपण ठेवू शकत नाही. दिल्लीत बसलेल्या बॉसला खूश करण्यासाठी हिंदूंना शिव्या घालाव्या घालतील, तरच आमदारकी टिकणार




आहे, हिंदुंना १०० शिव्या घाला अन् काँग्रेसचे पद मिळवा असं ते समीकरण असल्याची टीका नितेश राणे यांनी केलीयं.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज यांचा एकेरी उल्लेख करत आक्षेपार्ह वक्तव्य केलं. दरम्यान, या अपमानास्पद वक्तव्यावरून विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. त्यावर बोलताना नितेश राणे म्हणाले, नरेंद्र महाराजांचं काम अक्कलवासी वडेट्टीवारांनी पाहावं, नरेंद्र महाराजांएवढं काम करायचं असेल तर त्याला शंभर जन्म घ्यावे लागतील, असा टोला राणे यांनी वडेट्टीवारांना लगावलायं.अहिल्यानगरच्या मढी येथील यात्रेमध्ये मुस्लिम व्यावसायिकाला परवानगी न देण्याचा निर्णय मढीच्या ग्रामस्थांनी घेतलायं. या निर्णयाचं आम्ही स्वागत करुन ईस्लाममध्ये मुर्तीपुजेला परवानगी नाही. ते नवरात्रीमध्ये हिंदुंच्या नावे देऊन आतमध्ये प्रवेश मिळवत आमच्या माताभगिनींना टार्गेट करतात, जे देवी देवतांना मानत नाही तर त्यांनी तिथं येऊन व्यवसाय का करावा? असा सवालही राणे यांनी केलायं.

## संपादकीय ......

# महान मानवतावादी कर्मयोगी

वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे समाजसुधारक, कीर्तनकार, अंधश्रद्धा, जातिभेदाविरोधात आवाज उठविणारे संत, खेड्यापाड्यात शिक्षणाची गंगा पोहोचली पाहिजे, याचा कृतिशील पाठपुरावा करणारे विचारवंत, स्वच्छतेविषयी कृती कार्यक्रम राबविणारे गाडगे महाराज हे आधुनिक काळातील महान मानवतावादी, कर्मयोगी, क्रांतिकारक संत होते.

संत गाडगे महाराज यांनी शिक्षणाचे, समाज सुधारण्याचे केलेले काम महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीसाठी दिलेले योगदान मोलाचे आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे महात्मा गांधी आणि संत गाडगे महाराज यांच्यात जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणार्या दोन घटनांची इतिहासात नोंद आहे. २७ नोव्हेंबर १९३५ रोजी वर्धा येथे गाडगेबाबा आणि महात्मा गांधी यांची भेट झाली होती. गाडगे महाराजांचे स्वच्छतेविषयीचे कार्य ऐकून महात्मा गांधी यांना त्यांच्याविषयी उत्सुकता होती. या भेटीत विविध विषयांवर चर्चा झाली. त्यानंतर महात्मा गांधी यांनी १९३६ च्या फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनासाठी येण्याचे निमंत्रण गाडगेबाबा यांना दिले होते. फैजपूरच्या अधिवेशनात गाडगेबाबांनी स्वच्छतेचे काम केले. यावेळीही या दोन माहात्म्यांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाल्याची नोंद आहे. गाडगे महाराज आपल्या कीर्तनातून गांधीजींचे कार्य, सत्याग्रह, ब्रिटिशांविरुद्धचा लढा, चलेजाव आंदोलन याविषयी लोकांना माहिती देऊन जनजागृती करत होते. समाजसुधारक म्हणून गाडगे महाराजांची जितकी दखल घेतली गेली, तितके स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान प्रकाशात आलेले नाही.संत गाडगेबाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेंडगाव येथे झाला. त्यांचे लहानपणीचे नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. त्यांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गोशाळा, धर्मशाळा, दवाखाने आणि वसतिगृहे उभी केली. सगळ्या गोष्टी लोकवर्गणीतून केल्या. समाजासाठी कोट्यवधीची संपत्ती उभी करताना ते त्यापासून दूर राहिले. त्यांनी स्वतःसाठी एक छोटी झोपडीही बांधली नाही. त्यांनी आपले सारे आयुष्य समाजासाठी खर्च केले. एक काठी, जुनी झालेली चादर, मातीचे भांडे एवढीच त्यांची संपत्ती होती. त्यामुळे महाराष्ट्रातील विविध भागांत त्यांना गाडगेबाबा म्हटले जात होते. त्याच नावाने ते सर्वत्र परिचित झाले. लोकसेवा हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. दीनदुबळ्यांची सेवा हीच ईश्वर सेवा हा विचार त्यांनी रुजवला. अंधश्रद्धा, धार्मिक अवडंबरांना त्यांनी विरोध केला. परमेश्वर हा तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी अथवा मंदिरांमध्ये नाही, तर दरिद्री नारायणाच्या रूपाने तो समाजात विद्यमान आहे, असे ते सांगत.

संत गाडगे महाराजांनी तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मोठ्या धर्मशाळा बांधल्या. गोरगरीब यात्रेकरूंना मोफत निवासाची व्यवस्था करणे हा विचार त्यामागे होता. धर्माच्या नावाने दिले जाणारे पशुबळी आणि तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी होणारी भाविकांची लूट याला त्यांचा विरोध होता. एवढेच नाही, तर अस्पृश्यता, व्यसनाधीनता अशा समाजाला पोखरणार्या गोष्टींना त्यांनी कायम विरोध केला. ते लहान असतानाच दारूच्या व्यसनामुळे त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्याचा खोल परिणाम त्यांच्या मनावर झाला होता. गाडगेबाबांच्या आयुष्यातील अनेक घटना त्यांनी आपले सर्वस्व समाजासाठी अर्पण केल्याचे दर्शवितात. 'मी कुणाचा गुरू नाही आणि कोणी माझा शिष्य नाही,' असे संत गाडगे महाराजांनी अनेक ठिकाणी सांगितले असले, तरी संत तुकाराम महाराजांचा त्यांच्यावर प्रभाव होता. संत तुकाराम महाराजांच्या विचारांतून गाडगेबाबांनी मानव धर्माची एक नवीनच घडण घडविली. त्यातील अनेक तत्त्वांचा पुरस्कार त्यांनी संत तुकारामांच्या अभंगातून केला. संत कबीर, एकनाथ, चोखामेळा, जनाबाई, नामदेव यांच्या रचनांचाही ते आपल्या कीर्तनांमध्ये दाखला देत असत. मानवतेच्या या महान उपासकाने २० डिसेंबर १९५६ रोजी जगाचा निरोप घेतला. राष्ट्रसंत गाडगे महाराज हे निष्काम कर्मयोगी होते. त्यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन.

# सामाजिक, राजकीय सुधारणांचा ओनामा अकोल्यातील संदर्भ

ब्रिटीश काळात आधुनिकतेच्या स्पर्शाने एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शाळा-महाविद्यालये ठिकठिकाणी स्थापन होऊ लागली. शिक्षणाचा प्रसार झाला. याच काळात वर्तमानपत्रे-नियतकालिकांचा उदय झाला. वाङ्मयीन चळवळही जोर धरू लागली. नियतकालिके, व्याख्याने, सभा ही त्या काळातली लोकशिक्षणाची प्रमुख माध्यमे होती.पुण्यामुंबईत सामाजिक चळवळी, अनेक घडामोडी घडत होत्या. त्याचे पडसाद व-हाडातही उमटले. सामाजिक चळवळीचे धुरीण, साहित्यिक व प्रबोधनकार वि. मो. महाजनि यांच्या पुढाकाराने पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेच्या धर्तीवर अकोल्यात वर्षोत्सव व्याख्यानमाला सुरू झाली 'व-हाडातील शेतीचा गेल्या ११ वर्षातील इतिहास', 'ग्रामरचना', 'लोकसंख्येच्या वाढीचे नियम', 'जुने सिद्धांत व नवे शोध' अशा कितीतरी वेगवेगळ्या विषयांवर त्यावेळी व्याख्याने होत असत. शाळेच्या कक्षेबाहेर सर्वसामान्य समाजाच्या विचारांना चालना द्यायची असेल तर ते काम व्याख्यानांनी साधते, या धारणेतून या उपक्रमात सातत्य येत गेले. चर्चा, वादविवाद झडू लागले. वर्तमानपत्रांत वाचकांचे लेख, पत्रे, मते-मतांतरे प्रसिद्ध होऊ लागली.वऱ्हाडाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षक समाज स्थापन करण्यात आला, शिक्षक हा समाजातला शिक्षित वर्ग आणि विचार करण्याची शक्यता क्षमता असणारा वर्ग असतो. तो खेड्यापाड्यातून विखुरलेला आणि त्यांच्यामार्फत सुधारण्याचे विचार सर्वदूर पोहोचू शकतात हे लक्षात घेऊन या शिक्षक समाजाला जोडून १८९० पासून सामाजिक परिषद भरवण्यास आरंभ झाला.ही संस्थात्मक पायाभरणी वि. मो. महाजनी यांच्या नेतृत्वात होत होती. व्याख्यानमालेच्या पाठोपाठ नोव्हेंबर १८९० मध्ये 'व-हाड सामाजिक सुधारणा मंडळी' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेच्या सभेत सुधारणेचे नियम



ठरविण्यात आले. 'लग्न करताना मुलाच्या व मुलीच्या वयात फार मोठे अंतर असू नये. वधू पक्षास हुंड्याची अट घालू नये. पत्नीला व मुलांना शिक्षण द्यावे.' असे सुरूवातीच्या नियमांचे स्वरूप होते. बालविवाहाला प्रतिबंध करण्याचा प्रयत्न मंडळाने त्यावेळी केला. जुन्या विचारांच्या लोकांकडून त्यालाही विरोध होताच. 'असत्यद्वेष्टा' नावाची कुणीतरी व्यक्ती त्यावेळी वृत्तपत्रांत शुद्ध व-हाडी भाषेत पत्र लिहून टीका करत असे. त्यावर व-हाड समाचारमधून बरीच पत्रापत्री त्या काळात झाली. १९८५ च्या सुमारास महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे अकोला येथे 'विधवा-विवाह चळवळीचे उद्देश व विधवागृह स्थापण्याची आवश्यकता' या विषयावर व्याख्यान झाले.व-हाड सामाजिक सुधारणा मंडळीच्या बैठका पुढे अकोल्याव्यतिरिक्त इतरत्रही होऊ लागल्या. स्त्रियाही त्याला उपस्थित राहू लागल्या. १९०३ ची सभा नेटिव जनरल लायब्ररीत झाली. त्याला ६० पुरूष व १५ स्त्रिया उपस्थित असल्याची नोंद आहे.महाजनि हे नेमस्त विचारसरणीचे असले तरीही जहाल पक्षाचे लोकही त्यांना मान देत.न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकर, गोखले, तेजबहादुर शुक्रवार मालवीय या अनेकांशी त्यांचा चांगला परिचय होता.याच काळात राजकीय वातावरण झपाट्याने बदलू लागले. ब्रिटीशांविरोधातील चळवळ जोर धरू लागली. लोकमान्य टिळकांच्या सभा देशभर गाजू लागल्या.लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वात स्वतंत्र चळवळ अधिक प्रबळ बनली. १९१७ च्या सुमारास लखनऊ येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्यानंतर होमरूल लीग फंडासाठी लोकमान्य टिळक यांचा वऱ्हाडात दौरा निश्चित झाला. दोन दिवस त्यांचा मुक्काम अकोला येथे होता.टिळकांची राहण्याची सोय महाजनी यांच्या घरी व्हावी असे काहींचे मत होते; पण महाजनी हे नेमस्त आणि टिळक जहाल पक्षाचे. त्यात महाजनी हे शासकीय पेन्शनर होते. त्यामुळे लोकमान्य टिळक त्यांच्या घरी उतरले तर त्यांच्या पेन्शनवर गदा येईल, अशी भीती काहींनी बोलून दाखवली. त्यावर महाजनी ठामपणे म्हणाले की, माझे पेन्शन बंद झाले तरी पर्वा नाही टिळकांचे आतिथ्य करणे हे माझे कर्तव्य आहे. त्यानंतर टिळक महाजनांकडे उतरले. त्यांची जंगी सभा झाली. अकोलेकरांनी सभेला मोठी गर्दी केली. पुढे नी बेझंट काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्ष झाल्यावर अकोल्यात मोठी सभा झाली. महाजनी हेच सभेचे अध्यक्ष होत्या.

अशा अनेक घडामोडी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी अकोल्यात घडत होत्या. त्या काही प्रसिद्ध होणाऱ्या वऱ्हाड समाचार या वृत्तपत्रात त्याचा सविस्तर तपशील प्रसिद्ध होत असे..



**हर्षवर्धन पवार,**
जिल्हा माहिती धिकारी,अकोला

# महाराष्ट्रातील एक शेतकरी जास्तीत जास्त किती जमीन खरेदी करू शकतो? वाचा सविस्तर

**दि.२४विदर्भ प्रजासत्ताक –**

महाराष्ट्रातील लागवडीयोग्य असलेली जमीन कमी होत चालली आहे. याचे कारण म्हणजे वाढती लोकसंख्या आणि शहरीकरण, वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीचे मोठ्या प्रमाणात विभाजन होत आहे. त्यामुळे राज्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेकजण आता नवीन शेतजमीन खरेदीकरण्याचा विचार करत आहेत.

शेती करण्यासाठी तसेच गुंतवणूक म्हणून शेतजमीन विकत घेण्याचा जर तुमचा प्लॅन असेल तर ही बातमी तुमच्यासाठी महत्वाची आहे. खरंतर वेगवेगळ्या राज्यातील जमीन खरेदी संबंधित वेगवेगळे नियम अस्तित्वात आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रात शेतजमीन खरेदीचे नियम नेमके काय सांगतात. आपल्या राज्यात एक व्यक्ती जास्तीत जास्त किती शेतजमीन खरेदी करू शकतो? या प्रश्नाचे उत्तर या लेखातून घेऊयात....

महाराष्ट्रात सिलिंग कायदा (उशळश्रळपस -लीं) अस्तित्वात आहे. या कायद्यानुसार आपल्या राज्यात एका व्यक्तीच्या नावावर जास्तीत जास्त किती जमीन असावी? याबद्दल नियम सांगितले गेले आहेत. महत्त्वाचे म्हणजे या कायद्यानुसार जर एखाद्या व्यक्तीच्या नावावर मर्यादेपेक्षा जास्त जमीन असेल तर सरकार ती संपादित करून इतर व्यक्तींना वाटप करण्याची तरतूद आहे. पण महाराष्ट्र ज्या लोकांच्या नावे आधीच शेतजमीन आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागतो..** जे लोक शेतकरी आहेत, त्यांना शेतजमीन खरेदी करण्याचा अधिकार मिळतो, ज्यांच्याकडे सातबारा उतारा नाही, अशा लोकांना महाराष्ट्रात जमीन खरेदीचा अधिकार नाही. म्हणजेच राज्यात फक्त शेतकरी जमीन खरेदी करू शकतो. शेतकरी व्यतिरिक्त इतर लोकांना जर जमीन खरेदी करायची असेल तर त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागतो, रीतसर परवानगी घ्यावी लागते. पण जमीन खरेदीला परवानगी द्यायची की नाही, हे जिल्हाधिकारीच ठरवतात.

**किती जमीन खरेदी करू शकतो..**


दरम्यान महाराष्ट्रात एक शेतकरी जास्तीत जास्त किती जमीन खरेदी करू शकतो, याबाबतचा सिलिंग कायद्यातील नियम समजून घेऊयात, सिलिंग कायद्यानुसार बागायती शेती असेल म्हणजे ज्या ठिकाणी बारा महिने शेती केली जाऊ शकते, अशी बागायती शेती असल्यास एका शेतकऱ्याला जास्तीत जास्त १८ एकर जमीन खरेदी करता येते. मात्र जर शेती ही हंगामी बागायती असेल तर अशावेळी एक शेतकरी जास्तीत जास्त ३६ एकर जमीन खरेदी करू शकतो. म्हणजे एका शेतकऱ्याच्या नावावर जास्तीत जास्त ३६ एकर हंगामी बागायती जमीन असू शकते. जिथे बारा महिने पाणीपुरवठा नाही, पण एका पिकासाठी पाणीसाठा आहे, अशा ठिकाणी जास्तीत जास्त २७ एकर जमीन खरेदी करता येते. पण जर जमीन कोरडवाहू असेल तर एक शेतकरी जास्तीत जास्त ५४ एकर एवढी जमीन खरेदी करू शकतो. म्हणजेच महाराष्ट्रातील एका शेतकऱ्याच्या नावावर जास्तीत जास्त ५४ एकर एवढी जमीन असू शकते.

















## कढीपत्त्याचे आरोग्यासाठीही होतात अनेक लाभ

दि.२४विदर्भ प्रजासत्ताक ९

फोडणीत कढीपत्ता टाकला की भाजी किंवा आमटीला सुरेख सुवास व स्वाद मिळतो. त्यामुळे भारतीय स्वयंपाकघरात कढीपत्ता हा महत्त्वाचा घटक मानला जातो. चवीसाठी वापरला जाणारा हा पानांचा गुच्छ केवळ चवच वाढवत नाही, तर अनेक औषधी गुणधर्मांनी भरलेला असतो. दैनंदिन जीवनात कढीपत्त्याचे अनेक फायदे आहेत, जे आरोग्यासाठी उपयुक्त ठरतात, असे तज्ज्ञ सांगतात.

कढीपत्ता पचनसंस्था सुधारण्यास मदत करतो. अन्न पचवण्याची क्षमता वाढवतो आणि अपचन, गॅस किंवा आम्लता यांसारख्या समस्या कमी करतो. दररोज सकाळी रिकाम्या पोटी ५-६ कढीपत्त्यांची पाने चावून खाल्ल्यास पचनसंस्थेसाठी लाभदायक ठरते. कढीपत्त्यांचा केसांच्या आरोग्यावर सकारात्मक प्रभाव पडतो. त्यातील अँटिऑक्सिडंटस् आणि अमिनो ॲसिडस् केसांना पोषण देतात आणि केस गळती थांबवतात. कढीपत्त्यांचा रस नारळाच्या तेलात मिसळून केसांना लावल्यास केस दाट, चमकदार आणि मजबूत होतात. कढीपत्त्यात असलेल्या अँटिऑक्सिडंटस् आणि फायटोकेमिकल्समुळे हृदय निरोगी राहते.कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. कढीपत्ता रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. कढीपत्त्याचे नियमित सेवन केल्यास इन्सुलिनची कार्यक्षमता वाढते आणि मधुमेह असलेल्या लोकांना



फायदा होतो. कढीपत्त्याचा उपयोग त्वचेवरील डाग आणि पिगमेंटेशन कमी करण्यासाठी केला जातो. त्यातील नैसर्गिक गुणधर्म त्वचेला तजेलदार आणि निरोगी ठेवतात. कढीपत्ता शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यास मदत करतो. यामुळे चयापचय दर सुधारतो आणि वजन संतुलित राहते. कढीपत्त्यात असलेली जीवनसत्त्वे, अँटिऑक्सिडंटस्मुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि संसर्गापासून बचाव होतो. दैनंदिन जीवनात कढीपत्त्याचा समावेश केल्यास शरीरालाअनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.

# मुलीवर सामूहिक अत्याचार झालेला 'तो' मठही अनधिकृत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२४अमरावती** अल्पवयीन मुलीवर आठ महिन्यांचे गर्भारपण लादण्यात आले, तो मठ अनधिकृत असल्याचे जिल्हा बालसंरक्षण समितीने केलेल्या पाहणीत आढळले. सामूहिक बलात्कार प्रकरणाचा आरोपी सुरेंद्र मुनी तळेगावकर याने 'महंत' पद धारण करताच 'त्या' गावात तो मठ स्थापन केल्याचे उघड झाले. शिरखेड हद्दीतील एका मठात १९ फेब्रुवारी रोजी सामूहिक बलात्काराची ती घटना उघडकीस आली. पोलिसांनी आतापर्यंत सुरेंद्र मुनी तळेगावकर (७०), बाळासाहेब देसाई (३५), पीडिताची ४० वर्षीय मावशी व निखिल (२६) नामक मामा अशा चौघांना अटक केली. शुक्रवारी सकाळी ९ च्या सुमारास जिल्हा महिला व बालसंरक्षण अधिकारी अजय डबले, विधी अधिकारी ॲड. सीमा भाकरे,भूषण कावरे, मोर्शी तालुका बालसंरक्षण अधिकारी आकाश बरवट यांनी पथकासह 'तो' मठ, मठातील तळघराचे निरीक्षण केले आणि अन्य घटनाक्रम जाणून घेतला. त्या गावातील केवळ नऊ मठांची धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणी आहे. आरोपी सुरेंद्र मुनी तळेगावकर याचा मठ अवैध, अनधिकृत असून, त्याची चॅरिटी कमिश्नरकडे नोंदणी नसल्याचे तेथे दिलेल्या स्पॉट व्हिजिटदरम्यान आढळले, अशी माहिती जिल्हा महिला व बालकल्याण समितीच्या विधी अधिकारी ॲड. सीमा भाकरे यांनी दिली.


# कुंभ स्नानासाठी जाणाऱ्या कारचा समृद्धीवर अपघात

## पुणे-मुंबईचे पाच जण गंभीर जखमी, समृद्धी महामार्गाच्या चॅनल क्रमांक ११२ वर शेंदुरजना खुर्द जवळील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४ धा.रेल्वे**

प्रयागराज येथील कुंभमेळ्यासाठी समृद्धी महामार्गाने निघालेले चार चाकी वहाण भरधाव वेगाने समोर असलेल्या ट्रकला जाऊन धडकले.या भीषण अपघात मुंबई पुण्याचे सहा जण गंभीर जखमी झाले आहेत.चॅनल क्र.११२ वर शेंदुरजना खुर्द गावाजवळ घडलेला हा अपघात चालकाला झोपेची डुलकी आल्याने झाला असल्याचा प्राथमिक अंदाज महामार्ग पोलिसांनी व्यक्त केला आहे.

राज्यभरातुन प्रयागराज येथील कुंभमेळ्यात भाविक म्हणून नागरिक जात आहे.मुबंई व पुणे परिसरातील सहा मित्र पांढऱ्या रंगाचे इर्टिगा कार क्र. एमएच०३ इ आर ०४९४ या वहानाने शुक्रवार ता.२१ प्रयागराज येथे गंगा स्नान करण्यासाठी निघाले.कार मधील चालक रुपेश अरुण गुजर वय ३० सोबत सहप्रवासी ओमकार जाधव ३६, अमित शिंदे ३७,ओंकार थोटे४०,प्रदीप भोयर३५,अजित तांबे ४५ सर्व रा.मुंबई हे प्रयागराज जात होते.रात्रीचा प्रवास झाल्यानंतर शनिवारी ता.२२ सकाळी ८ च्या दरम्यान समृद्धी महामार्गाच्या चॅनल क्र.१२२ जवळ चालक रुपेश गुजर याचे वाहनावरील नियंत्रण सुटले.अचानक भरधाव वेगाने अनियंत्रित कार पुढे जात असलेल्या ट्रक क्रमांक एम एच४० एके ६६४७ ला मागून जोरदार धडकली.सदर अपघातामध्ये ओमकार थोटे, प्रदीप भोयर,अजित तांबे,ओमकार जाधव, रुपेश गुजर,अमित शिंदे हे गंभीर जखमी झाले.घटनेची माहिती मिळताच महामार्ग पोलीस व तळेगाव दशासर पोलिसांनी घटनास्थळ गाठले. दरम्यान रुग्णवाहिका १०८ वरील डॉक्टर व चालक सुमित मारोटे यांनी जखमींना प्रथमोपचार देऊन गंभीर अवस्थेत पुढील उपचारासाठी तात्काळ धामणगाव ग्रामीण रुग्णालय येथे आणले.ओमकार थोटे, प्रदीप भोयर,अजित तांबे यांना छातीला, तोंडाला, डोक्याला जबर मार लागला असल्याने त्यांची प्रकृती खालावल्याने सर्वांना पुढील उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे.महामार्ग पोलिसांनी अपघात ग्रस्त दोन्ही वाहाने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली असून सदर अपघात सुद्धा वहान चालकाला झोपेची डुलकी आल्याने झाला असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे.





RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २४ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# विद्यार्थ्यांनी पारंगत होऊन समाजाच्या विकासासाठी कार्यरत रहावे - राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन








## दीक्षांत समारंभ उत्साहात साजरा

## मुलींच्या वसतीगृहाचे भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** - पदवी पूर्ण होणे ही विद्यार्थ्याच्या आयुष्याची सुरुवात आहे. पुढील आयुष्यात विद्यार्थ्यांनी जगभरातील ज्ञानशाखांमध्ये पारंगत होऊन संपादन करावे. ज्ञानाचा उपयोग समाजाच्या हितासाठी करावा, तसेच राष्ट्र निर्माणासाठी अविरत कार्यरत रहावे, असे आवाहन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४१वा दीक्षांत समारंभ विद्यापीठ परिसरात पार पडला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते आदी उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी, विद्यापीठ स्थापनेपासून विद्यार्थ्यांना परवडणारे उच्च शिक्षण देत आहे. दर्जेदार शिक्षण देऊन विद्यापीठाने नागरिकांचे जीवनमान बदलण्यात आणि संपूर्ण प्रदेशाची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. आता विद्यापीठाने पारंपारिक अभ्यासक्रमांसोबत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग, डेटा सायन्स, सायबर सुरक्षा आणि रोबोटिक्स या प्रगत क्षेत्राचे शिक्षण देण्यासाठी पुढाकार घ्यावा. विद्यार्थ्यांनी शिक्षणातील गुणवत्तेसोबतच खेळामध्येही प्राविण्य मिळवावे. आजच्या घडीला खेळाडू सर्वाधिक मानधन घेत आहेत. त्यामुळे खेळाडूंना पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षणासाठी पाठिंबा देऊन उत्कृष्ट खेळाडू घडवावेत.

केंद्र शासनाने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत जनाबाई, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मराठी भाषेतून विपूल लेखन आणि उपदेश केले आहे. मातृभाषा ही प्रत्येकाच्या हृदयस्थानी असते. त्यामुळे भाषेला अभिजात दर्जा मिळणे गौरवास्पद आहे. विद्यार्थ्यांनीही जगातील विविध भाषा शिकून प्रगती करावी. भाषेसोबतच विविध बोलींचा अभ्यास आणि तिचे जतन करावे. त्यासोबतच इतर भाषांमधील ज्ञान मराठीत भाषांतरित केल्यास त्याचा सामान्यांना फायदा होईल. भाषेसोबतच विद्यापीठाने उद्योगांच्या गरजा पूर्ण करतील असे अभ्यासक्रम तयार करावेत.

स्टार्टअप इकोसिस्टम आणि इनक्युबेशन केंद्रांमुळे स्थानिक उद्योगांना पुरक वातावरण तयार होईल. उद्योगांची गरज पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने संशोधन आणि विकासासाठी सहकार्य करावे. रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करताना काम आणि जीवनाप्रती सकारात्मक दृष्टीकोनही येणे गरजेचे आहे. या सर्व प्रयत्नांतून प्रधानमंत्र्यांचे २०४७मधील विकसित राष्ट्राचे स्वप्न साकार होईल.

न्यायमुर्ती श्री. गवई म्हणाले, जिल्ह्याला संतांची महान परंपरा लाभली आहे. त्यांनी समाजाचे प्रबोधन करून मत परिवर्तन केले. त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. आजच्या काळात शिक्षण हे सर्वात मोठे शस्त्र आहे. विद्यार्थ्यांनी इच्छाशक्ती बाळगून शिक्षणातून प्रगती करावी, तसेच शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी करावा. आत्मसात केलेल्या शिक्षणाच्या माध्यमातून नवा भारत घडविण्याची क्षमता नव्या पिढीवर आहे. सक्षम विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी विद्यापिठाने ओळखून कार्य करावे. सर्वदूर आणि सर्वस्तरातील घटकांना शिक्षण मिळावे, यासाठी विद्यापीठाने कार्य करावे. प्रामुख्याने ग्रामीण विकास मोहिम राबवून ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत करावी. विद्यार्थ्यांनीही समाजाच्या विकासासाठी अविरत संघर्ष करून अभावग्रस्तांना मदत करावी, असे आवाहन केले.

यावेळी राज्यपाल यांच्या हस्ते मुलींच्या वसतीगृह आणि विस्तारीत इमारतीचे आभासी पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. बारहाते यांनी स्वागतपर भाषण केले. तसेच अहवालाचे वाचन केले. सुरवातीला राज्यपाल यांना राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने मानवंदना देण्यात आली. दीक्षांत समारंभात शितल पांडव, निकिता देवचे, अनिकेत पांडे, राधा चमेडिया, हर्षाली हटवार, उत्कर्षा वानरे, धनश्री सरकळे, लक्ष्मी चौधरी, प्राची बोरगावकर, शेख इक्रा अदीबा मोहमंद मुश्ताक यांचा सत्कार करण्यात आला.

# बेलकुंडातील जंगलात वाघाची डरकाळी दुचाकीस्वारांनी अनुभवला थरारक क्षण गुगामलचे जंगल झाले संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४ मेळघाट-** गुगामल वन्यजीव विभागातील कोहा आणि राजदेव बाबा मधील अकोट मार्गावर बिनधास्त व स्वच्छंदपणे विचरण करताना वाघाला अनेक प्रवाशांनी पाहल्याने वन्यवपर्यावरणप्रेमी आनंदीत झालेले आहे.धारणीपासून ३५ किमी अंतरावर हरिसाल ते अकोट मार्गावरील बेलकुंड मंदिराजवळ मागील चार-पाच दिवसांपासून पट्टेदार वाघ आरामाने फिरत आहे. परतवाडातेतारूबांदाकिंवा ढाकणा व अकोट ते तारूबांदा किंवा ढाकणा, अकोट ते हरिसाल येणाऱ्या अनेकांनी वाघाला पाहलेले आहे. २१ फेब्रुवारी रोजी रात्री ८ चे दरम्यान गडगाभांडमुमचे माजी उपसरपंच चंद्रभान पाटील आणि साध गायक हे दोघेआपल्या दुचाकीने परतवाडा येथून ढाकणाकडे येत होते. कोहा आणि बेलकुंडच्या विश्रामगृहा दरम्यानच्या सडकेवर बुलूम (बमुडा) जवळ एक धिप्पाड वाघ आरामाने उभा होता. दुरूनच साधला वाघ दिसल्याने बाईक उभेकरून दोघांनी शांतपणे वाघाचे दर्शन केले. यावेळी दोघांना निवांतपणे वनराजाला पाहले. कोणताही आवाज केला नाही. काही मिनिटापर्यंत वाघ आणि बाई स्वार एकमेकाला पाहतच राहले. नंतर वाघ मोठ्या धीर गंभीरपणे आपल्या वनात निघून गेला. दोघांनी थराराचे वर्णन करताना गुगामल वन्यजीव विभाग व चिखलदरा रेंजला शुभेच्छा दिल्या. कोहा, कुंडसह अनेक गावे पुर्नवसित झाल्याने मानवरहित भाग झालेला आहे. वन्य प्राण्यांचे स्वर्ग मानले गेलेले व अतिसंरक्षित कोक्टु परिसरात या भागाला लागूलच आहे. जुनच्या प्रारंभी अनेक वन्य प्राण्यांचे मुक्त विचरण होणे शक्य आहे.

# सासऱ्याचे दान, जावायाला जीवनदान

## अमरावती पार पडली ४९ वी मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया

### डॉ. अविनाश चौधरी यांचे विशेष योगदान







**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** - वैद्यकीय क्षेत्रात अमरावतीत मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध होत असल्याने आता मोठ्या शहराच्या धरतीवर अमरावतीत देखील मोठ्या शस्त्रक्रिया यशस्वी होताना दिसून येत आहे. शहरात तब्बल ४९ वी मूत्रपिंड प्रत्यारोपणाचे शस्त्रक्रिया पडली असून सासऱ्याने दिलेली किडनी जावयाच्या जीवनासाठी वरदान ठरली आहे.येथील शासकीय हॉस्पिटल मध्ये काल मोठी शस्त्रक्रिया पार पडली सासर्याने जावयाला किडनी देऊन त्याचे पुढील जीवन सुखकर केले आहे. विदर्भ संदर्भ सेवा रुग्णालयात डॉ. अविनाश चौधरी यांच्या विशेष पुढाकारातून ही शस्त्रक्रियाची प्रक्रिया पार पडली. कोंढाळी येथील सुखदेव बारंगे वय वर्ष ७० यांनी आपल्या जावयाला किडनी देऊन त्यांना नवीन जीवनदान दिले आहे. गेल्या अनेक वर्षापासून डॉ.अविनाश चौधरी यांच्याकडे उपचार घेणारे विनोद मानमोडे वय वर्षे चाळीस राहणार विलास नगर हे मूत्रपिंड विकाराने ग्रस्त होते. महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड अमरावती येथे कार्यरत आहेत. वर्षभरापासून ते आजाराने ग्रस्त असल्यामुळे डॉ.अविनाश चौधरी यांनी त्यांना डायलिसिस द्वारे उपचार केलेले होते. किडनी ट्रान्सप्लांट साठी विचारपूस केल्यानंतर निंद यांच्या सासर्यांनी त्यांना किडनी देण्याची तयारी दर्शवली. सदर प्रक्रियेसाठी आवश्यक सगळ्या बाबींची पूर्तता करून डॉ. अविनाश चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २१ फेब्रुवारी रोजी शासकीय विदर्भ सेवा रुग्णालयात मूत्रपिंड प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यासाठी शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांच्या नेतृत्वात डॉ.राहुल पोटोळे ,डॉ.विक्रम देशमुख, डॉ.चिरडे,डॉ.घुले, डॉ.बाहेकर व भुलतज्ञ डॉ.रोहित हातगावकर, डॉ.घोरमोडे व इतर तज्ञ डॉक्टरांच्या चमुने शस्त्रक्रिया यशस्वी पार पाडली. या शस्त्रक्रियेसाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे सोनाली चौधरी व सौ बोंडे,तसेच संकल्प चौधरी हॉस्पिटल आणि शासकीय रुग्णालय येथील सर्वच कर्मचारी यांचे मोलाचे योगदान लाभले

# जिल्ह्यात सहावी ते आठवीच्या २०० शाळा शिक्षकाविना

## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** सन २०२४-२५ ची संच मान्यता शिक्षण विभागाने जाहीर केली. त्यानुसार शून्य ते वीस पटसंख्या असलेल्या शाळातील सहावी ते आठवीच्या वर्गांना शून्य शिक्षक दर्शविले आहेत. अमरावती जिल्ह्याचा विचार करता जवळपास २०० शाळांचे सहावी ते आठवीचे वर्ग शून्य शिक्षक झाले आहेत. राज्यभरात अशा शाळांचे प्रमाण पाच ते सहा हजारापर्यंत असू शकते. म्हणजेच या शाळांमध्ये वर्ग पहिली ते सातवी किंवा वर्ग पहिली ते आठवीसाठी केवळ दोन शिक्षक उपलब्ध असतील.शासनाने दिनांक १५ मार्च २०२४ ला शून्य ते वीस पटसंख्या असलेल्या प्राथमिक शाळांवर सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याचा शासन निर्णय काढलेला होता व त्याच्यानंतर १५ सप्टेंबर २०२४ ला सन २०२४-२५ ची संच मान्यता करण्याचा शासन निर्णय जाहीर केला होता. महाराष्ट्रातील सर्व शिक्षक संघटना समन्वय समितीने सदर शासन निर्णयाचा निषेध करून दिनांक २५ सप्टेंबर २०२४ ला राज्यभर एक दिवशीय रजा आंदोलन करून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले होते. तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी शिक्षक संघटना समन्वय समिती सोबत चर्चा करून सदर शासन निर्णयांमध्ये दुरुस्ती करण्याचे मान्य केले होते. त्यानुसार १५ मार्च २०२४ चा कंत्राटी सेवानिवृत्त शिक्षक नेमणुकीचा शासन निर्णय नुकताच रद्दबातल केला आहे. परंतु ५ सप्टेंबर २०२४ च्या शासन

निर्णयाबाबत कुठलीही दुरुस्ती न केल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे एक हजार ते पंधराशे लोकसंख्या असणाऱ्या गावांमधील सहावी ते आठवीच्या वर्गांवर संक्रांत आलेली आहे. यामूळे पालकांमध्ये प्रचंड मिती व अस्वस्थता निर्माण होईल. या निर्णयांमध्ये शासनाने ताबडतोब सुधारणा करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबवावे, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्याकडे अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघातर्फे करण्यात आल्याची माहिती वरिष्ठ उपाध्यक्ष किरण पाटील यांनी दिली.

# जिल्ह्यात पाणी टंचाईचे सावट१७ कोटी ३७ लाखांचा आराखडा तयार



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४अमरावती** - अमरावती जिल्ह्यात यंदाही जवळपास ७०७ गावे पाणीटंचाईच्या छायेत असून, १४ तालुक्यांतून टंचाई निवारणार्थ उपाय योजना सुचविण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने पाणीटंचाईचा सुमारे १७ कोटी ३७ लाख ९९ हजार रुपयांचा आराखडा तयार केला आहे. सदर आराखडा मान्यतेसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला होता. या आराखड्यावर जिल्हाधिकारी यांनी शिक्कामोर्बत केले आहे. त्यामुळे टंचाईची कामे करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.यंदा ४८३ खासगी विहिरींचे अधिग्रहण प्रस्तावित आहे. नळ योजनांची विशेष दुरुस्ती, नवीन विंधन विहिरी, पूरक नळ योजना, बंद हातपंपांची दुरुस्ती आदी उपाय योजना करण्यात येणार आहे. यात २९ गावात टँकर ने पाणी पुरवठा,२०२ गावांमध्ये नळ योजनांची दुरुस्ती,४८३ गावांमध्ये खाजगी विहरीचे अधिग्रहण व २९१ नवीन विंधन विहिरी घेणे असा तब्बल १७ कोटी ३७ लाखांचा आराखडा तयार झाला असून जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी याला मंजुरी दिली आहे.

# नागपूर, मुंबई, पुण्याच्या प्रवाशांना वाढीव रेल्वेची मेजवाणी धामणगाव, बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला स्थानकावर थांबा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती-** प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेतर्फे मुंबई-नागपूर-मुंबई आणि नागपूर-पुणे-नागपूर विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. होळी सणानिमित्ताने मूळ गावी जाणाऱ्यांची गर्दी वाढत असल्याने विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत. यामध्ये नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई विशेष गाडी आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर विशेष या दोन्ही गाड्या ९, ११, १६ व १८ मार्चला चालविण्यात येणार आहे. दोन्हीगाड्यांनावर्धा, धामनगाव, बडनेरा, मुर्तिजापूर, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, मनमाड, नाशिक रोड, इगतपुरी, कल्याण, ठाणे व दादर स्थानकावर थांबा राहणार आहे.

पुणे-नागपूर विशेषगाडी ११ व १८ मार्चला आणि पुणे-नागपूर विशेष गाडी १२ व १९ मार्चला चालविण्यात येणार आहे. ही गाडी पुणे येथून ३.५० वाजता प्रस्थान करेल व दुसऱ्या दिवशी सकाळी६.३० वाजता नागपुरात दाखल होईल. नागपूर-पुणे विशेष गाडी १२ व १९ मार्चला आणि नागपूर-पुणे विशेष गाडी १३ व २० मार्चला धावले. या गाड्यांना उरुली, दौंड, अहमदनगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा, धामनगाव व वर्धा स्थानकावर थांबा राहणार आहे.मुंबई (सीएसएमटी) - नागपूर सुपरफास्ट विशेष गाडी रविवार आणि मंगळवारी मुंबईहून रात्री ११.२० वाजता निघेल आणि नागपूरला दुपारी ३.१० वाजता पोहोचेल. नागपुर झमुंबई (सीएसएमटी) सुपरफास्ट विशेष गाडी रविवार आणि मंगळवारी नागपूर येथून रात्री ८ वाजता निघेल आणि मुंबईला (सीएसएमटी) दुसऱ्या दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल. हीगाडी २४ डब्यांची राहणार आहेत. यामध्ये दोन ब्रेकव लगेज, चार सर्वसाधारण, चार शयनयान, एक एसी फर्स्ट क्लास, एक एसी फर्स्ट व सेकंड, दोन एसी सेकंड, १० थर्डी एसी, राहणार आहे. ही गाडी दादर, ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक, मनमाड, जलगांव, भुसावल, मलकापूर, शेगांव, अकोला, मुर्तिजापुर, बडनेरा, धामनगांव, वर्धा येथे थांबणार आहे.

पुणे -नागपूर सुपरफास्ट विशेष गाडी पुण्याहून मंगळवारी दुपारी ३.५० वाजता निघेल आणि नागपूरला दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता पोहोचेल. नागपूर - पुणे सुपरफास्ट विशेष गाडी नागपूरहून बुधवारलासकाळी ८ वाजतानिघेल आणि पुण्याला रात्री ११.३० वाजता पोहोचेल. ही गाडी २० डब्यांची असणार आहे. यागाडीलाउरूली, दौंडकॉर्ड लाइन, अहमदनगर, बेलापुर, कोपरगांव, मनमाड, जलगांव, भुसावल, मलकापुर, शेगांव, अकोला, बडनेरा, धामनगांव, वर्धा येथे थांबे आहेत.

# महिलेच्या पोटातून काढला २४ किलोचा 'ट्यूमर'



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४अमरावती :** – येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी) एका ३५ वर्षीय महिलेच्या पोटातील ट्यूमरची जटिल शस्त्रक्रिया करण्यात आली. चार



तास चाललेल्या या शस्त्रक्रियेत २४.४ किलो वजनाचा गोळा काढून डॉक्टरांनी त्या महिलेला जीवनदान दिले. धारणी तालुक्यातील खटणार येथील ३५ वर्षीय महिला तीन मुलांची आई आहे. मागील आठ ते नऊ महिन्यांपासून पोटाचा आकार वाढत चालला होता. यावेळी अधूनमधून पोटात दुखायचे म्हणून महिलेने जवळच्या रुग्णालयात जाऊन तपासणी केली. तपासणीअंती या महिलेच्या पोटात पाणी आहे, असे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर उपचार घेऊन किमान तीन ते चार वेळा पोटातील पाणी काढण्याचे प्रयत्न देखील झाले. परंतु, पोटाचा आकार कमी होईना आणि त्रासही होत होता. तसेच त्या महिलेला श्वास घेणेही कठीण झाल्याने खाणे पिणेही बंद झाले होते. याशिवाय अशक्तपणा वाढला. यामुळे शरीरातील रक्त कमी झाले होते. त्यामुळे स्थानिक डॉक्टरांनी अमरावती येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालयात या महिलेला पाठवले. या वेळी महिलेची तपासणी केली असता पोटात पाणी नसून मोठी गाठ असल्याचे निदर्शनास आले.ही गाठ पोटात सर्वत्र परसरली. त्यामुळे शहरातील आतड्या, छाती (फुफ्फुस) पोट, किडनी, इतर अवयव दबल्या गेले. सुपर स्पेशालिटी येथील डॉक्टरांनी सीटीस्कॅन व इतर तपासण्या केल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. कॅन्सर हार्मोन सीए १२५ जे साधारण ३५ च्या खाली हवे, ते रुग्ण महिलेमध्ये १ हजारपेक्षा जास्त वाढलेले होते. रक्त अत्यंत कमी असल्याने २ रक्त पिशव्या देण्यात आले. डॉक्टरांना शस्त्रक्रिया करताना लहान मोठे आतडे, पोटावरील चरबीचा पडदा सगळे ट्यूमरला चिकटलेले होते.

ही शस्त्रक्रिया ४ तास चालली आणि २४.४ किलोचा गोळा काढण्यात आला. महिलेला डाव्या अंडाशयाचा कॅन्सर असल्याचे आढळून आले. ही शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत विनामूल्य करण्यात आली. यामध्ये विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनात स्त्री कर्करोग विशेषज्ज्ञ डॉ. भावना सोनटक्के यांनी ही शस्त्रक्रिया पार पाडली. भूलतज्ज्ञ डॉ. सचिन गोंडाणे, डॉ. चेतन देऊळकर, ओटी इन्चार्ज बिल्कीस सिस्टर, डॉ. माधव घोपरे, शीतल बोंडे, कोमल खाडे, जया वाघमारे, अपेक्षा वाघमारे, शंकर, गोविंद, लक्ष्मी यांनी सहभाग घेतला.

# ग्राम पंचायत दापोरी येथे ५६ लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्राचे वाटप !

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांनी मानले शासनाचे आभार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२४मोर्शी–** मोर्शी तालुक्यातील दापोरी येथे ग्राम पंचायत स्तरावर दिनांक २२ फेब्रुवारी रोजी ग्रामसभेचे आयोजन करून प्रधानमंत्री आवास योजना ग्रामिण टप्पा–२ मधील दापोरी येथील ५६ लाभार्थ्यांना माजी महिला बाल कल्याण सभापती सौ वृषाली विघे यांच्या हस्ते मंजुरी पत्र वितरीत करण्यात आले. १ जानेवारी २०२५ पासून राज्यात महाआवास सुरू करण्यात आले या अभियाना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात येणार आहे. या मोहिमे दरम्यान लाभार्थ्यांनी पुढाकार घेऊन लवकरात लवकर बांधकाम पूर्ण करून आपल्या हक्काचे घर मिळवावे असे आवाहन जिल्हा परिषदेच्या माजी महिला बाल कल्याण सभापती सौ वृषाली विघे



यांनी घरकुल लाभार्थ्यांना केले. जिल्हा परिषद शाळा दापोरी येथे दुपारी १:३० वाजता सभा आयोजित करण्यात आली होती या सभेला गावातील जास्तीत जास्त ग्रामस्थ, मंजूर लाभार्थी व त्यांचे कुटूंब आणि सर्व शासकीय/निमशासकीय कर्मचारी गावातील उत्साही तरूण, सेवाभावी संस्था, बचत गट, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचा मोठा सहभाग पाहायला मिळाला. यावेळी जिल्हा परिषद शाळेमध्ये एल.ई.डी.टि.व्ही. ची व्यवस्था करून दुपारी ४ वाजता बालेवाडी पुणे येथून झालेल्या मंजूर लाभार्थ्यांना मंजूरी पत्र देणे व निधी वितरण आदेशाचा कार्यक्रम केंद्रीय गृहमंत्री. भारत सरकार तसेच राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे हस्ते संपन्न झाला असून त्या कार्यक्रमाचा लाईव्ह टेलीकास्ट दापोरी येथे जमलेल्या शेकडो नागरिकांना दाखविण्यात आला. शासनाच्या १० लाख लाभार्थी यांना आवास योजना मंजुरी पात्र, निधी वितरण कार्यक्रम ग्राम पंचायत स्तरावर माजी पहिला बाल कल्याण सभापती सौ वृषाली प्रकाश विघे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच संगीता ठाकरे, ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके, वर्षा फलके, सचिन उमाळे, सचिव विनोद राऊत, मुख्याध्यापक गजानन चौधरी, यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भागातील नागरिकांच्या घराचे स्वप्न साकार करत असून, राज्य शासनाने उर्वरित लाभार्थ्यांनाही लवकरात लवकर हप्ते वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या लाभार्थ्यांना आणखी तीन लाभ मिळणार म. गांधी राष्ट्रीय ग्राम रोजगार हमी योजनेतून ९० दिवसाच्या मजुरीचा लाभ देण्यात येणार असल्याचे मार्गदर्शन नागरिकांना करण्यात आले यावेळी लाभार्थ्यांसह ग्रामस्थांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती मोठ्या प्रमाणात दर्शवली.

# २६ रोजी भूतेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

## स्व. गिन्नीदेवी जुगलकिशोर अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती–** दरवर्षी महाशिवरात्रीचा उत्सव गिन्नी देवी जुगलकिशोर अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्ट आणि भूतेश्वर मंदिर संस्थेच्या सहकार्याने मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. यावर्षीसुध्दा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री उत्सवानिमित्त स्थानिक भुतेश्वर मंदिरात कै. गिन्नी देवीं जुगलकिशोर अग्रवाल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त दैनिक अमरावती मंडळचे संपादक अनिल अग्रवाल पत्नीसह सकाळी ५ वाजता भगवान भूतेश्वराच्या मूर्तीची पूजा करतील आणि प्रसाद अर्पण करतील. त्यानंतर सकाळी ८ ते दुपारी १२ वाजेपर्यंत अग्रवाल समाजाचे अध्यक्ष विजय केडिया आणि समाजसेवक लप्पी जाजोदिया यांच्या हस्ते ट्रस्टच्या अधिकाऱ्यांकडून भूतेश्वर मंदिरात सर्व भाविकांना साबुदाणा खिचडी प्रसाद म्हणून वाटली जाईल.भूतेश्वर मंदिर संस्था आणि कै. गिन्नी देवी जुगलकिशोर अग्रवाल ट्रस्टच्या वतीने ऋषी राजेश अग्रवाल यांनी सर्व भाविकांना महाशिवरात्री उत्सवानिमित्त प्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

# प्रोत्साहन निधी केव्हा ?

## शेतकरी वंचित कार्यालय बँकांमध्ये वाढले हेलपाटे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** – कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान देण्याचे घोषित केले होते. परंतु, या योजनेमधील काही पात्र लाभार्थी अजूनही मदतीपासून वंचित आहेत. या लाभार्थ्यांना प्रोत्साहन अनुदान मिळेल का नाही, असा प्रश्न विचारला जात आहे.

महात्मा फुले कर्जमुक्ती योजनेअंतर्गत कर्जाचा नियमित भरणा करून परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनाचे बळ मिळावे म्हणून ही योजना सुरू केली होती. यामधील पात्र लाभार्थ्यांना लाभ दिला जातो.



### कोणाला मिळतेय अनुदान?

१ सन २०१८–१९ अथवा २०१९–२० या वर्षात घेतलेल्या व त्याची पूर्णतः परतफेड केलेल्या अल्प मुदत पीक कर्जाची रक्कम ५० हजारांपेक्षा कमी असल्यास अशा शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या मुद्दलाच्या रकमेइतका प्रोत्साहन लाभ दिला जातो.

### काय आहेत अडचणी?

राज्य शासनाने पाच वर्षांपूर्वी केलेल्या कर्जमाफी योजना व नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा लाभ अजूनपर्यंत मिळालेला नाही.

२०२१ मध्ये तत्कालीन सरकारने नियमित कर्ज फेडणाऱ्यांसाठी प्रोत्साहन योजना जाहीर केली होती. प्रोत्साहन अनुदान म्हणून ५० हजार रुपये नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना देण्याचे शासनाने जाहीर केले होते. ज्या शेतकऱ्यांचे अनुदान जमा झालेले नाही. ते शेतकरी बँकेत चकरा मारत आहेत.

अनेक शेतकऱ्यांचे बँक खाते आधारशी संलग्नित नाही, तसेच काही शेतकऱ्यांचे व्हेरिफिकेशन झालेले नाही. काही शेतकऱ्यांनी त्रुटींची पूर्तता केली नाही. यासह विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी व प्रोत्साहन अनुदानाचा लाभ मिळालेला नाही.

# बिबट्याने केली गायीची शिकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४ अमरावती–** वरूड (ता.प्र.) दि. २३ : तालुक्यातील वाडेगाव येथील शेतकरी दतात्रय तुळशीराम दाभाडे यांच्या मौजा वाडेगाव शेत शिवारात गिरसायवान प्रजातीच्या चार वर्षीय गायीवर बिबट्याने हल्ला चढवून फडशा पाडला. रविवारी २३ फेब्रुवारी रोजी पहाटे अंदाजे ५.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

शेतकरी दतात्रय दाभाडे हे सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास शेतात शेतीकामानिमित्त गेले असता त्यांना त्यांची गाय मृतावस्थेत आढळून आली. त्या गायीवर कुठल्यातरी वन्य प्राण्यांने हल्ला चढविल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी या घटनेची माहिती वनविभागाला दिली. वनविभागाचे शेकदरीचे सहायक वनपाल एस.एस. इंगळे, राजुराबाजार नियत श्रेत्राचे वनरक्षक एम.जी. मनगटे यांनी पंचनामा केला. त्यांना गायीच्या मानेवर बिबट्याच्या पंजाचे निशान आढळून आले. त्यानंतर पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. सारडे यांनी घटनास्थळीच गायीचे शवविच्छेदन केले.

# दहा मागण्यांच्या पुर्तता करण्यासाठी जागर-गोंधळ आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती**

जय वळेखण आदिवासी क्रांती संघटना च्या वतीने आपल्या दहा मागण्यांना घेऊन सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग,अमरावती च्या कार्यालया समीप सकाळी ११ वाजता पासून जागर–गोंधळ आंदोलनाला सुरुवात करण्यात आली.यापूर्वी संबंधित कार्यालयाला दिनांक १८ सप्टेंबर २०२३,६ जानेवारी २०२५ तसेच १० फेब्रुवारी २०२५ रोजी या मागण्यांना घेऊन निवेदन सादर करण्यात आले आहे. परंतु जय वळेखण आदिवासी क्रांती संघटना च्या वतीने करण्यात आलेल्या मागण्यांची दखल घेतली जात नसल्याने अखेरीस संबंधित संघटनेचे वतीने जागर–गोंधळ



आंदोलनाचा पवित्रा स्वीकारण्यात आला.१) आदिवासी अप्पर आयुक्त कार्यालय,अमरावती अंतर्गत येणाऱ्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करण्यात यावी,२)एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय,धारणी येथील प्रकल्प कार्यालयाची उप–शाखा अमरावती शहरात सुरू करण्यात यावी,३)आदिवासी बहुल भागात ठक्कर बाप्पा योजना राबविण्यात यावी,४)अप्पर आयुक्त कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सर्व आश्रम शाळेत रोजंदारी कर्मचारी म्हणून आदिवासी सुशिक्षित बेरोजगार युवकांना प्राधान्य देण्यात यावे,५)अप्पर आयुक्त कार्यालय अंतर्गत येणाऱ्या सर्व आदिवासी आश्रम शाळेत ऑनलाइन पध्दतीने मंजूर भाजीपाला पुरवठा निविदा प्रमाणे होत नाही, तो पुरवठा तात्काळ निविदा प्रक्रिया प्रमाणे करण्यात यावा,६)अमरावती शहरात पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण व महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा भरती पूर्व प्रशिक्षण तात्काळ सुरू करण्यात यावे,७)अमरावती शहरातील वसतिगृहाची विद्यार्थी क्षमता वाढविण्यात यावी आदींसह एकूण दहा मागण्यांना घेऊन जागर–गोंधळ आंदोलन केले जात आहे.या आंदोलनात सहभागी झालेल्या युवकांनी अर्जुन युवनाते यांचे मार्गदर्शनाखाली ढोल–मृदुंग–झांज–टाळ आदी साहित्याचा वापर करून जागर–गोंधळ पारंपरिक पद्धतीने निद्रिस्त प्रशासनाला जागे करण्यासाठी अभिनव आंदोलन करीत आपल्या मागण्यांची पूर्तता होण्यासाठी यावेळी अप्पर आयुक्त,आदिवासी विकास विभाग, अमरावती यांना यावेळी निवेदन सादर करण्यात आले. आमचा लढा हा नेमका कशासाठी यासंदर्भात जय वळेखण आदिवासी क्रांती संघटना अध्यक्ष–रोहित झाकर्डे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले.

# पण मी शेतकऱ्यांसाठी बोलेल अजून पडलो तरी त्याची परवा नाही:- बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४चांदुर बाजार–** छत्रपती शिवाजी महाराजांनी या देशातली वतनदारी बंद केली व शेतकऱ्याच्या देठालाही हात लावाल तर कापले जाल असं म्हणणारा राजा आता कोणत्याच पक्षात दिसत नाही, ५०% नफा धरून आम्ही शेतमालाला भाव देऊ असं भाजपने म्हटलं होतं, व कॉंग्रेसने स्वामीनाथन आयोग लागू करू असं म्हटलं होतं मात्र मात्र कॉंग्रेसने सुद्धा ते लागू केलं नाही पार्टी



कोणतीही असली तरी ते शेतकऱ्यांच्या हितासाठी राहत नाही हे ७५ वर्षात पाहिलं, *मी हे शेतकरी म्हणून बोलत आहे राग आला तरी चालेल, बच्चू कडू याची पर्वा करत नाही,ही लाचारी जर करता आली असती तर कोणाचा पाठिंबा घेऊन आमदार होता आलं असतं पण ती लाचारी आमच्यात नाही.

असे वक्तव्य अमरावती जिल्ह्यातील पळसखेड येथे शिवजयंती निमित्त च्या कार्यक्रमात बच्चू कडू यांनी केले.

# परदेश शिष्यवृत्तीसाठी आता करा २५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज

## मुदतवाढीने विद्यार्थ्यांना दिलासा, अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठी योजना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२४अमरावती** – अल्पसंख्याक विकास विभागांतर्गत अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांकरिता परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२४–२५ करिता परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत रिक्त असलेल्या जागी पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सन २०२४–२५ करिता परदेश शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवारांना २५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज सादर करण्यास मुदतवाढ दिली आहे.

सन २०२४–२५ परदेशातील





उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेला विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विद्यार्थीअल्पसंख्याक समुदायातील घटकातील असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएच.डी.साठी ४० वर्षे कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखांपेक्षा जास्त नसावे. विद्यार्थ्याला पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत व पीएच.डी.साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे.पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम विद्यार्थ्याने अर्जाच्या दिनांकाला उत्तीर्ण केलेला असावा. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत २००च्या आतील असावी.

### विद्यार्थ्यांनी येथे करावा अर्ज

विद्यार्थ्यांनी https://fsmaharashtra.gov.in या वेबसाइटवरून अर्ज डाऊनलोड करून तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रांसह २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत ऑनलाइन भरून त्याची प्रिंट, समक्ष किंवा पोस्टाने समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च रोड, पुणे येथे सादर करावा. महाराष्ट्र शासनाची वेबसाइट https://fs-maharashtra.gov.in या ऑनलाइन पोर्टलवर माहिती भरावी, असे सहायक आयुक्त, समाज कल्याण,यांनी कळविले आहे.

# प्राथमिक व माध्यमिकचे शिक्षक घेत आहे क्षमतावृध्दीचे धडे

## शासकीय विद्यानिकेतन अमरावती येथे भातकुली तालुकास्तरीय प्रशिक्षनाला सुरुवात : १८ मार्गदर्शक व ३३६ प्रशिकणार्थ्यांचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. २४ अमरावती**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी संपूर्ण देशभरात विविध टप्यावर करण्यात येत आहे. त्याअंतर्गत महाराष्ट्रामध्ये हे धोरण पूर्णपणे लागू करण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने ५ दिवसीय तालुकास्तरीय शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण १० ते १४ फेब्रुवारी २०२५ला पहीला टप्पा,१७ते२१फेब्रुवारी दुसरा टप्पा आणि तिसरा टप्पा २४ते२८फेब्रुवारी २०२५ दरम्यान शासकीय विद्यानिकेतन अमरावती येथे आयोजित करण्यात आले आहे.

तालुकास्तरीय प्रशिक्षणात १८ तज्ज्ञ मार्गदर्शक तालुक्यातील ३३६ प्रशिक्षणार्थिना सध्या प्रशिक्षण देत आहे. यात जिल्हा परिषदेचे व खासगी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा समावेश आहे. जिल्हास्तरावर प्रशिक्षण घेणारे प्रशिक्षणार्थी हे तालुकास्तरावर तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून कार्य करीत आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील महत्वाचे बदल पोहोचविण्याचे काम केले जाणार आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन आराखडा, क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनिती, क्षमता आधारित प्रश्न निर्मिती कौशल्ये, विचार प्रवर्तक प्रश्न, समग्र प्रगतीपत्रक इत्यादी विषयावर हे प्रशिक्षण दिले जात आहे.

# राज्यपालांची वझ्झर अनाथ आश्रमास भेट

## बालगृहातील मुलांची भेट घेवून आस्थेने केली विचारपूस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य मतिमंद मूकबधिर बेवारस बालगृहाला भेट दिली. यावेळी राज्यपाल यांनी अनाथ आश्रमाला भेटवस्तू दिल्या. तसेच बुरघाट येथील निवासी शाळेला भेट दिली. वझ्झर बालगृहात राहून मोठ्या झालेल्या आणि आता लग्न झालेल्या मतिमंद, मूकबधिरांना राज्यपालांच्या हस्ते भेटवस्तू देण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री शंकरबाबा पापळकर, आमदार केवलराम काळे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, अतिरिक्त आदिवासी आयुक्त रवींद्र ठाकरे, राजभवनचे नियंत्रक जितेंद्र वाघ, उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार संजय गरकल, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर, अनिल गडेकर आदी उपस्थित होते. राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी बालगृहातील मुलांची भेट घेवून विचारपूस केली. लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केलेल्या माला पापळकर यांचा राज्यपालांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



श्री. पापळकर यांनी बेवारस मतिमंद मुलांच्या कायम पुनर्वसनाची मागणी केली. तसेच अनाथश्रमातील १२ मुलामुली शासकीय नोकरी करीत आहे. तसेच आश्रमात १२३ विकलांग मुले आहेत. त्यांच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालगृहात राहता येत नाही. तथापि, हा नियम या मुलांसाठी जाचक असल्याने त्यात सुधारणा आवश्यक असल्याचे सांगितले.

राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी, प्रत्येक मागणीबाबत सकारात्मक मदत करण्यात येईल. बेवारस, मतिमंद व मुकबधिर मुलांचे प्रश्न जाणून घेवून पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांनी पालकत्व स्वीकारले आहे. श्री. पापळकर यांच्या मागणी आणि मुलांचे प्रश्न सोडवण्यासाठी जातीने लक्ष दिले जाईल. बेवारस, मतिमंद मुलांच्या पुनर्वसनासाठी शंकरबाबा पापळकरांनी केलेले कार्य गौरवास्पद आहे. या क्षेत्रातील त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. पद्मश्री पुरस्काराचा सन्मान हा सर्व मुलीमुलींचा आणि त्यांचा सांभाळ करणाऱ्यांचा असल्याचे सांगितले.

यावेळी पद्मावती व दिलीप ढगे, बेबी व बल्लम पापळकर, वैशाली आणि अनिल पापळकर, शोभा आणि अमित पापळकर, सुशीला आणि अशोक देशमुख, शैलजा आणि राजेंद्र फुले यांना भेटवस्तू आणि 'गीता' ग्रंथ भेट देण्यात आला. तसेच सलमा आणि सईद खान यांना भेटवस्तू आणि 'कुराण' ग्रंथ भेट देण्यात आला. आश्रमातील गांधारी हिने स्वागतगीत सादर केले. त्यानंतर राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांनी या अनाथाश्रमातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची निवासी शाळा, बुरडघाट येथे भेट दिली. यावेळी त्यांनी मुलींशी संवाद साधला.



श्यामनगर स्थित संत गजानन महाराज मंदिर येथे भागवत कथेची सांगता काल्याच्या कीर्तनाने झाली यावेळी ह.भ.प. शुभम महाराज भिलापूर काल्याचे कीर्तन झाले व दहीहंडी फोडण्यात आली.

# चांदूर वनपरिक्षेत्रात झाली वणव्याची एंट्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४पोहरा बंदी**

चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अंतर्गत चिरोडी वर्तुळातील पश्चिम चिरोडी बीट वनखंड क्रमांक ३११ मध्ये रविवारी दुपारी २ च्या सुमारास अचानक आग लागली. सलग तीन आर्गीमुळे यंदाच्या उन्हाळ्यातील वणव्याची बोहणी झाल्याचे बोलले जात आहे.




आग लागल्याची माहिती मिळताच चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार घटनास्थळी तडकाफडकी दाखल झाले. यावेळी चिरोडी वर्तुळातील पथक घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सायंकाळी ६ वाजता आग नियंत्रणात आली.फेब्रुवारीत वनव्याची बोहणी झाली. या आठवडाभरात सलग ही आगीची तिसरी घटना आहे. यापूर्वी वडाळी वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या पोहरा वर्तुळातील पोहरा बीटला दोनदा किरकोळ आगीने विळख्यात घेतले होते. रविवारी चिरोडी वर्तुळातील पश्चिम चिरोडी बीट भीषण आगीच्या विळख्यात सापडले.भीषण आगीत चार ते पाच हेक्टर जंगलातील गवत, पालापाचोळा, रायमुन्या झाडी, इतर झुडपे, मोठ्या वृक्षांसह पक्षी, कीटकांनाही आगीचा फटका बसल्याचा अंदाज आहे.

# रंग, रूप, सुगंध मोहक, 'स्ट्रॉबेरी' झाली स्वस्त

## डिसेंबर व जानेवारीच्या सुरुवातीला मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आंबट-गोड चव असणारी लाल रंगाची आकर्षक स्ट्रॉबेरी सर्वांच्याच आवडीचे फळ आहे. स्ट्रॉबेरीला डिसेंबरअखेर आणि जानेवारीच्या सुरुवातीला मोठ्या प्रमाणात मागणी असते. गेल्या २० दिवसांत घाऊक बाजारात किलोच्या भावात जवळपास १०० रुपयांनी घट झाली आहे.



सध्या जिल्ह्यात स्ट्रॉबेरीचे दर आवाक्यात आले आहेत. शरीरासाठी फळांचे सेवन महत्त्वाचे असल्याचे सांगितले जाते. पोषक तत्त्वांचा खजाना फळांमध्ये असतो. त्याचप्रकारे स्ट्रॉबेरीमध्येही पोषक तत्त्व असल्याने स्ट्रॉबेरीचे सेवन शरीरासाठी फायद्याचे असते. यामुळेच सध्या नागरिकांचा कल स्ट्रॉबेरी खरेदीकडे दिसून येत आहे.मध्यंतरीच्या काळात जिल्ह्यात स्ट्रॉबेरीचा १२० ते १५० रुपयांत २५० ग्रॅमचे बॉक्स मिळत होता. मात्र, आता दरात घसरण झाली असून ८० ते १०० रुपयांत २५० ग्रॅमचे बॉक्स मिळत आहे. साधारणतः किलोमागे ५० ते १०० रुपये दर कमी झाले आहेत.स्ट्रॉबेरीमध्ये जीवनसत्त्वे, खनिजे मुबलक प्रमाणात असतात. त्यातील व्हिटॅमीन-सी आणि मॅग्नेशियम रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मोठी मदत होते. आरोग्य सुदृढ राहण्यास उपयुक्त फळ आहे.

### स्ट्रॉबेरी वजन अन् साखर कमी करते

स्ट्रॉबेरी सेवनाचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत. या फळात कॅलरी व साखरेची मात्रा कमी असते. मुबलक फायबर असतात. या फळाच्या सेवनाने वजन व शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणात राहते. वर्षातून चार ते पाच महिनेच या फळाचा हंगाम असतो.

# प्रेमविवाहाचा दुर्दैवी शेवट........पत्नीची हत्या करून पतीनेही संपविले जीवन

## रहाटगाव शेतशिवारातील घटना : सात महिन्यांपूर्वी झाला होता प्रेमविवाह





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नांदगाव पेठ**

सात महिन्यांपूर्वी आंतरजातीय विवाह करून सुखी संसाराची स्वप्नं रंगविणाऱ्या एका कुटुंबाचा आज दुर्दवी शेवट झाला.पत्नीची गळा आवळून तिची हत्या केल्यानंतर स्वतः पतीनेसुद्धा आत्महत्या करून जीवन संपवील्याचा धक्कादायक प्रकार आज (रविवारी) सकाळी ८ वाजताच्या सुमारास रहाटगाव येथील प्रज्ज्वल पात्रे यांच्या शेतात घडला.अमोल सुरेशराव गायकवाड (३५), व शिल्पा अमोल गायकवाड (३२) असे घटनेतील मृतकांचे नावे आहेत.घटनेमागील मूळ कारण अद्याप पुढे आले नाही मात्र नांदगाव पेठ पोलीस याबाबत सर्वच बाजूने तपास करीत आहे. घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की,मूळचे धामणगाव तालुक्यातील वाठोडा व सध्याचे रहाटगाव येथील रहिवासी अमोल सुरेशराव गायकवाड व रामगाव येथील शिल्पा अमोल गायकवाड यांचा सात महिन्यांपूर्वी आंतरजातीय विवाह झाला होता. कल्पदीप मंगलकार्यालय मागे असलेल्या जिल्हा पुरवठा कार्यालयातील पुरवठा निरिक्षक प्रज्वल विठ्ठलराव पात्रे यांच्या शेतात अमोलचे वडील रखवालदारी आणि मजुरी करत होते. त्याठिकाणी असलेल्या दुमजली फार्म हाऊस मध्ये अमोल आणि शिल्पा तसेच अमोलचे वडील सुद्धा वास्तव्यास होते. दोन दिवसांपूर्वी अमोलचे वडील बाहेरगावी गेले होते आणि रविवारी सकाळी परत आल्यानंतर त्यांनी मुलगा आणि सुनेला आवाज दिला मात्र त्यांना प्रत्युत्तर न मिळाल्याने अमोलच्या वडिलांनी खोलीत जाऊन बघितले तर खोलीत पलंगावर शिल्पाचा मृतदेह दिसला तर तर अमोलचा फासावर अडकलेला मृतदेह त्यांना दिसला. त्यांनी लगेच ११२ वर फोन करून लगेच पोलिसांना पाचारण केले.शिवाय नांदगाव पेठ पोलीस स्टेशनचे ठाणेदार महेंद्र अंभोरे यांना माहिती मिळताच ते देखील आपल्या ताफ्यासह घटनास्थळी पोहचले.श्वान पथक व फॉरेन्सीक टीमला सुध्दा यावेळी पाचारण करण्यात आले. पोलीस उपायुक्त सागर पाटील, फ्रेजरपुरा विभागाचे एसीपी कैलास पुंडकर हे सुध्दा घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा करून शिल्पा व अमोल यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवले.घटनेबाबत प्रमुख कारण अद्याप स्पष्ट नाही.अमोल ने शिल्पाची हत्या का केली असावी? स्वतः गळफास का घेतला? की अजून काही घातपात झाला याबाबत सर्वच बाजूने पोलीस तपास करीत आहे.पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कवडे तपास करीत आहे.

# गवारीचा भाव वाढला, किलोला ६० रूपये शेतकरी वळला भाजीपाला उत्पादनाकडे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४दर्यापूर**

जिल्ह्यात कापूस, सोयाबीन,हरभरा, गहू, ही प्रमुख पिके असली तरी अनेक शेतकरी भाजीपाला उत्पादनाकडे वळले आहेत. त्यात कमी पाण्यात व हलक्या जमिनीत येणाऱ्या गवार पिकालाही पसंती दिली जात आहे.अमरावती जिल्ह्यातील शेती प्रामुख्याने निसर्गावर अवलंबून असली तरी प्रयोगशील शेतकरी शेतीत विविध प्रयोग करून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. बाजारपेठेत कोणत्या पिकाला मागणी आहे, ही बाब लक्षात घेऊन पिकांची निवड केली जात आहे. प्रत्येकजण आरोग्य जपण्याचा प्रयत्न करीत असून भाजीपालाही दररोजच्या आहारात पाहावयास मिळत आहे. गवाराच्या शेंगांत असलेले पौष्टिक घटक पाहता या शेंगांना बाजारात चांगली मागणी आहे.विशेष म्हणजे हे पीक कमी पाण्यात व हलक्या जमिनीतही येणारे असल्याने अनेक भाजीपाला उत्पादक शेतकरी गवार पीक घेत आहेत. भाजी बाजारातइतर भाजीपाल्याचे दर कमी-जास्त होतात. मात्र गवारीच्या शेंगांना किमान ४० रुपये प्रतिकिलोच्या तरच दर मिळतो. पिकांची योग्य निगा राखल्यास जास्तीत जास्त उत्पादन निघत असल्याने हे पीक फायदेशीर ठरत आहे. जिल्ह्यातील अनेक प्रगतशिल शेतकऱ्यांनी गवार शेंगांची लागवड केली.

### गवारीपासून डिंक, हिरवा चारा अन् खते


गवारीच्या हिरव्या शेंगांची भाजी खाण्यासाठी वापरली जातेच. शिवाय गवारीपासून डिंक, जनावरांचा हिरवा चारा, हिरवळीची खते व डिंकाच्या कामासाठी म्हणूनही वापर केला जातो.चांगल्या आरोग्यासाठी गवारीच्या शेंगांना अनेकांची पसंती असते. त्यामुळे मागणीही मोठी आहे. हमखास नफा मिळवून देणारे पीक म्हणून गवारीकडे अनेकजणांकडून पाहिले जाते.गवार हे उष्ण हवामानामध्ये येणारे पीक असून खरीप व उन्हाळी दोन्ही हंगामामध्ये गवार पीक घेतले जाते. कमी कालावधीत येणारे पीक असून पाणीही इतर पिकांच्या तुलनेत कमी लागते.प्रत्येकजण आरोग्याची काळजी घेत असून दररोजच्या आहारात भाजीपाल्याला पसंती दिली जात आहे. इतर भाजीपाल्यासह गवारीच्या शेंगाही खाल्लूया जातात. विद्यार्थ्यांच्या डब्यातही गवार दिसत आहे.

# श्री क्षेत्र तपोवनेश्वर संस्थानला जय्यत तयारी

## महाशिवरात्री महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

क्षेत्र तपोवनेश्वर संस्थान येथे महाशिवरात्री महोत्सवच्या पर्वावर १९ ते २६ फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



१९ फेब्रुवारी ते बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केलेले आहे. रोज सकाळी ७.०० वा. तिर्थ स्थापनेनंतर श्री गणेश पूजन, दीप पूजन, नवग्रह देवता, षोडशमातृका, सप्तघृतमातृका पूजन, चर्तुषष्ठी योगीनी पूजन, मरुदगन पूजन, सर्वतोभद्रमंडल देवता पूजन, लिगतोभद्रमंडल देवता पूजन, घटदेवता पूजन, सकाळी ८.३० वा श्री तपोवनेश्वर भगवान यांचे दुग्धधारेने रुद्राभिषेक पूजन व आरती, तसेच योगीराज सद्गुरु श्री सितारामगिरी महाराज समाधीचे पुरुषसुत अभिषेक पूजन व आरती व त्यानंतर होमहवन, दुपारी १२.०० वा. भोजन प्रसाद व अन्नदान, सायंकाळी ६.०० वा. तपोवनेश्वर भगवान यांचे रुद्राभिषेक पूजन, आरती व योगीराज सगुरु सितारामगिरी महाराज यांच्या समाधीचे पूजन व आरती रात्री ९.०० वा. भोजन प्रसादाचे आयोजन. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन आचार्य अनिल महाराज शर्मा यांच्या मार्गदर्शनात संपन्न होत आहे. गुरुवार २० फेब्रुवारी रोजी रात्री ८ वा. ह.भ.प. श्री. लच्छुरामजी महाराज, गुरुदेव सेवा मंडळ, पोहरा बंदी यांचे भजन. शुक्रवार २१ फेब्रुवारीरोजी दुपारी १.०० वा. महिला भजन मंडळ, पिपळखुटा यांचे भजन. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी १.०० वा. गुरु माऊली महिला भजन मंडळ, राजना, चांदूर रेल्वे यांचे भजन. रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता गुरुदेव सेवा मंडळ, पिपळखुटा यांचे भजन. सोमवार २४ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वा. विजयाताई कोहळे, महिला भजन मंडळ, पोहरा बंदी यांचे भजन. २५ फेब्रुवारी रोजी रात्री ८ वा. श्री. महारुद्र भजन मंडळ, बोडणा यांचे भजन. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वा. श्री रामचरित्र मानसमंडळ यांचे संगीतमय सुंदरकांडचा कार्यक्रम व रात्री ८ वा. ह.भ.प. श्री लच्छुरामजी महाराज, गुरुदेव सेवा मंडळ, पोहरा बंदी यांचे भजनाचा कार्यक्रम. बुधवार दि. २६ फेब्रुवारी महाशिवरात्री पर्वा निमित्त पहाटे ४.०० वा. पासून रुद्राभिषेक व आवाहीत देवता पूजन, सकाळी ६.०० वा. योगीराज सद्गुरु श्री सितारामगिरी महाराज यांच्या समाधीचे पूजन व आरती. सकाळी ७.०० वा. होमहवन, दुपारी१२.०० वा. मध्यान्ह आरती, रात्री ९.३० वा. बर शिवनाम जप मालेला सुरवात होईल. रात्रीच्या न वेगवेगळ्या प्रहरी वेगवेगळ्या यजमानाद्वारे हे महारुद्र अभिषेक व शिवमंत्र जपाचे आयोजन न केले आहे. गुरुवार २७ फेब्रुवारीला सकाळी ६.०० पासून वरील प्रमाणे धार्मिक कार्यक्रम होईल. सकाळी १०.३० वा.ह.भ.प. श्री. आशिष महाराज आखरे (सालोरा) यांचे काल्याचे कीर्तन, दुपारी १२.०० वा. दहिहांडी व शोभायात्रेचे आयोजन व - त्यानंतर दुपारी १ ते ४ पर्यंत महाप्रसादाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाच्या आयोजनाची तपशीलवार माहिती श्री क्षेत्र तपोवनेश्वर संस्थानचे अध्यक्ष अनिल भोजराजजी साहू व त्यांचे कार्यकारणीचे सहकारी, उपाध्यक्ष लच्छुराम पवार, सचिव निलेश कुबडे, विश्वस्त-प्रवीण सावळे, रविसेठ पंजापी, रामचंद्र गुप्ता, रुपचंदजी खंडेलवाल, दिलीप ठाकरे, राजेश आचलिया, विठ्ठलभाऊ पवार, प्रमोद बंड, संजय शहाणे, विनायकराव फुटाणे, बलराम खेमानी, सचिन सावळे, राजेश जैन, अमित बेहरे, विजय यादव, प्रा. विनय बनसोड, देविदास औघड, मांगीलाल चव्हाण यांनी परीसरातील सर्व श्रद्धाळू भाविकांनी धार्मिक सोहळ्यात संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# कुटीर रुग्णालयात रुग्णांची हेळसांड नर्सेसच्या भरोशावर रुग्णालयाचा कारभार

## वैद्यकीय अधीक्षकांचे दुर्लक्ष : चौकशी करण्याचीनागरिकांची संतप्त मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अचलपूर**

कुटीर रुग्णालय, परतवाडा येथे रुग्णसेवेच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या रुग्णालयात डॉक्टर केवळ राउंडसाठी येतात, तर संपूर्ण रुग्णालयाचा कारभार मोजक्या नर्सेसच्या भरोशावर सुरू असल्याचे समोर आले आहे.चांदूर बाजार तालुक्यातील राजना पूर्ण येथील रहिवासी सुभान खान बिस्मिल्लाहा खान (वय ५५) हे त्यांच्या सहा वर्षीय नातवासोबत उपचारासाठी कुटीर रुग्णालयात आले होते. संध्याकाळी सहा-साडेसहा वाजता लघवीसाठी बाहेर गेलेल्या सुभान खान यांना विषारी सापाने दंश केला. तातडीने त्यांना कुटीर रुग्णालयातून दाखल करण्यात आले, मात्र योग्य उपचारांची व्यवस्था नसल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले.

**डॉक्टरांच्या अनुपस्थितीमुळे गंभीर स्थिती**

मिळालेल्या माहितीनुसार, कुटीर रुग्णालयात डॉक्टर फक्त राउंडवर येतात आणि उर्वरित वेळेत रुग्णसेवेची जबाबदारी केवळ एक-दोन नर्सेसवर टाकली जाते. परिणामी, दैनंदिन १०० ते १५० पेशंटवर प्रभाव पडत आहे. अनेक रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत, तसेच तातडीच्या परिस्थितीतही रुग्णांना दुसऱ्या रुग्णालयात हलवावे लागत आहे.

**वैद्यकीय अधीक्षकांवर गंभीर आरोप**

रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक सुरेंद्र ढोले यांच्यावरदेखील गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ते रुग्णालयातील कामकाजाकडे दुर्लक्ष करतात आणि स्वतःच्या खासगी रुग्णालयावर अधिक लक्ष केंद्रित करत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. तसेच, सतत वादग्रस्त ठरणारे ढोले हे मागील १० वर्षांपासून या पदावर कार्यरत असून, त्यांची बदली केली जावी, अशी मागणी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

**रुग्ण व नातेवाईकांचे प्रशासनाकडे साकडे**

या हलगर्जीपणामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयातील व्यवस्थापन सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, डॉक्टरांची उपस्थिती सुनिश्चित करावी आणि वैद्यकीय अधीक्षक सुरेंद्र ढोले यांची बदली करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.शासनाने या प्रकरणाची दखल घेऊन लवकरात लवकर योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा परतवाडा येथील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# वन विभागात नवख्या 'आरएफओं'ना क्रीम पोस्टिंग

## परिविक्षाधीन अधिकाऱ्यांसाठी विशेष सोय; आठ महिने ठेवलीत पद रिक्त, अर्थकारणाचा करिष्मा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

राज्याच्या वन विभागात अंदाधुंद कारभार सुरू असून, महत्त्वाची पदे आठ महिने रिक्त ठेवल्यानंतर नवख्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना अनुभव नसताना महत्त्वाच्या पोस्टिंग वन मंत्रालयातून मिळाल्या आहेत. मोठे अर्थकारण या पोस्टिंग मागे दडल्याची चर्चा आता आहे. महाराष्ट्र नागरी सेवा २०१९ मध्ये लोकसेवा आयोगामार्फत भरती झालेल्या ४१ वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांच्या क्षेत्रीय प्रशिक्षणाचा कालावधी २१ फेब्रुवारी रोजी संपुष्टात आल्यानंतर या आरएफओंना नियमित पदस्थापना देण्यात आली. कार्यासन अधिकारी वी. श. जाखलेकर यांच्या आदेशाने संबंधित आरएफओंना कर्तव्यावर हजर होण्याच्या सूचना मिळाल्या आहेत. मात्र, व्याघ्र प्रकल्प आणि सामाजिक वनीकरणातील पदे रिक्त ठेवण्यात आले असून, केवळ क्रीम पोस्टिंग नवख्या आरएफओंना देण्यामागचा हेतू अर्थकारणाशी निगडित असल्याची चर्चा होत आहे.

**३१ आरएफओंना प्रादेशिकमध्ये पोस्टिंग**

वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांपैकी ३१ जणांना प्रादेशिकच्या पोस्टिंग देण्यात आल्या आहेत. मे २०२४ पासून या जागा रिक्त ठेवण्यात आल्या, हे विशेष. कारण परिविक्षाधीन काळ संपणार असल्यामुळे या नवख्या आरएफओंसाठी अगोदर जागा बुक केल्या होत्या. त्यामुळे मे २०२४ मध्ये महत्त्वाच्या या सर्व जागा भरण्यात आल्या नाहीत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, मेहकर, अहेरी, पिंपळनेर, धारूर, येवला, जत, पंढरपूर आदी परिक्षेत्राची पदे रिक्त ठेवण्यात आली होती. प्रादेशिक उपविभागात पोस्टिंग मिळविण्यासाठी नवख्या आरएफओंनी मंत्रालयात अगोदरच आपले वजन खर्ची घातले. केवळ ८ जागा या वन्यजीव उपविभागातील असून, अद्यापही काही पदे रिक्त ठेवून प्रादेशिक उपविभागात पदे भरण्यात आली.

**लक्ष्मीदर्शनामुळे लाभ**

आठ महिने जागा रिक्त ठेवण्यामागचा हेतू समोर आला आहे. सेवेत दिवस उजाडलेल्या आरएफओंना 'लक्ष्मीदर्शन' मार्गे वन विभागात सहज पोस्टिंग मिळते. प्रादेशिक उपविभागातील दरारा, अर्थकारण याची भुरळ पडलेल्या नवख्या आरएफओंना प्रादेशिकमध्ये संधी देण्यासाठी मे महिन्यात सोय करण्यात आली. परिविक्षाधीन काळ संपल्यानंतर मनासारखी पोस्टिंग त्यांना देण्यात आली. त्याकरिता पडदा मागची सूत्रे अगोदरच हलविण्यात आली होती.

वन्यजीव विभागात केवळ ४ जणांना पोस्टिंग परिविक्षाधीन वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना नुकतीच पदस्थापना देण्यात आली. पदस्थापना यादीवर नजर टाकल्यास केवळ ८ आरएफओंना वन्यजीव उपविभागात पदस्थापना दिल्या गेली. राज्याच्या व्याघ्र प्रकल्पांमध्ये ३० च्यावर आरएमओंची पदे रिक्त असून, ती गत आठ महिन्यापासून भरण्यात आली नाहीत.

# आ.रवी राणा यांची दमदार कामगिरी : सावरखेड ,तातारपुर या गावातील ३४३ कुटूंबाचे होणार पुनर्वसन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

आ.रवी राणा हे सातत्याने निम्न पेढी प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांना लेखी पत्र देऊन त्या अनुषंगाने पाठपुरावा करत आले आहे.त्यांच्या प्रयत्नाला यश येऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी बैठकीत कृषी विभागाची जमीन जि वलगावं रोडवर आहे ती पुनर्वसन करण्यासाठी देण्याचे आदेश जिल्हाधिकारी अमरावती व कृषी विभागात यांना देण्यात आले आहे.सविस्तर वृत्त असे की निम्न पेढी प्रकल्पांतर्गत मौजा सावरखेडु ततारपुर या गावातील ग्रामस्थांनी ग्रामसभेचा ठराव घेऊन त्यांच्या इच्छेनुसार त्या गावातील ३४३ कुटूंबाचे पुनर्वसन करायचे आहे भूखंड व नागरी सुविधा करिता साधारणता २५ हेक्टर आर जमिनीची आवश्यकता भासणार आहे. प्रकल्पग्रस्तांची उपजीविका पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे प्रकल्पग्रस्तांचे उर्वरित शेती करण्याकरिता बुडीत गावठाण गावठाण जवळील लगतची जागा मिळावी अशी मागणी आमदार रवी राणा यांनी माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडे केली असता, मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र शासन कृषी विभागाची वलगाव जवळची जमीन वरील उपयोगसाठी देण्याचे आदेश दिले असून,जिल्हाधिकारी अमरावती व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अमरावती यांना संयुक्त कारवाई करावी असे निर्देश दिले आहे. येणे प्रमाणे पाठपुरावा करण्यासाठी आमदार रवी राणा यांनी आपले सचिव उमेश ढोणे त्यांना सूचना दिल्या आहेत. वरील मागणी संबंधाने सरपंच, उपसरपंच व ग्रामस्थ तसेच युवा स्वाभिमान पार्टीच्या पदाधिकार्यांनी आ.रवी राणा यांचे आभार मानले आहे.

# चाऱ्याला डिझेलइतका भाव : भाड्याच्या बैलजोडीवर कसली जाते शेती

**अरुण जोशी**



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

चाराटंचाईमुळे गुरांच्या बाजारात दर आठवड्याला विक्रीसाठी आलेल्या जनावरांची संख्या वाढत असल्याचे दिसत आहे. दुसरीकडे, बैलजोडीची किंमतही लाखात गेल्यामुळे बैलजोडी सांभाळणे सामान्य शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेर गेले आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीची विभागणी झाल्याने बहुतांश शेतकरी अल्पभूधारक झाला आहे. याशिवाय जिल्ह्यात चाराटंचाई असल्याने चाऱ्याच्या दराने डिझेलची बरोबरी गाठली आहे. त्यामुळे बैलजोडी अनेक जण ठेवताना दिसत नाही.

सध्या जिल्ह्यात अल्पभूधारक शेतकऱ्यांना बैलजोडीच्या साहाय्याने तसेच ट्रॅक्टरने शेती करणे परवडणारे नाही. यामुळे बहुतांश शेतकरी भाड्याने शेती कसत असल्याचे चित्र जिल्ह्यात सर्वत्र दिसून येते.शेतीची आंतरमशागत करण्यासाठी बैलांची आवश्यकता भासते. आता बैलांच्या किमती लाखात पोहोचल्या आहेत. बैलांचा सांभाळ करण्यासाठी मोठा खर्च येत असल्याने शेतीच्या मशागतीसाठी बैल खरेदी करण्यापेक्षा ट्रॅक्टर खरेदीकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. दिवसेंदिवस शेती करणे आता कठीण होत आहे. खते, बियाणे, औषधी यांचा खर्च गगनाला भिडला असतानाच शेतीवर नफा मिळणे कठीण झाले आहे.सध्या जिल्ह्यात सालगड्याचे भाव एका वर्षासाठी लाखांच्या घरात पोहोचले आहेत. एवढे पैसे देऊनही जनावरांचे संगोपन करायला मजूर मिळणे कठीण झाले आहे. सर्वसाधारण बैलजोडी लाखाच्या घरात पोहोचल्या आहेत.

### बैलजोडी नको; त्यापेक्षा जुना ट्रॅक्टरच परवडला

बैलांच्या किमती भडकल्याने व संगोपनाला परवडत नसल्याने शेतकऱ्यांचा ओढा ट्रॅक्टर खरेदीकडे वाढला आहे. यातच शेतकऱ्यांना ट्रॅक्टर व यंत्र खरेदीसाठी शासनाच्यावतीने अनुदान दिले जात आहे.

जिल्ह्यात बैलजोडीच्या किमती वाढल्या आहेत. ६० ते १ लाख रुपये खर्च करून बैल खरेदी करणे अवघड बनले आहे. इच्छा असूनही बैलजोडी खरेदी करू शकत नाही. त्यातच ट्रॅक्टर खर्चही झेपत नाही. यामुळे शेती कसणे सुरू आहे.

**प्रदिप बंड (शेतकरी)**

### लागवड कमी झाल्याने कडब्याचा भावही कडाडला

जिल्ह्यात ३० वर्षापूर्वी ज्वारी, तुरीचे कुटार व कडबा हे पाळीव जनावरांचे मुख्य खाद्य होते. पण, काळाच्या ओघात ज्वारीचे उत्पादन पडद्याआड झाले. आता तर अंत्यविधीसाठीही कडबा मिळणे कठीण आहे. लागवडीअभावीच कडब्याचे भाव कडाडले आहेत.गत पाच वर्षांपासून रब्बीची नुकसानग्रस्त होत आहे. शेती व्यवसायात यंत्रांचा वापर वाढला आहे. गहू, तूर, सोयाबीन आदी पिकांची मळणी हार्वेस्टरद्वारे केल्यामुळे कुटार जनावरांच्या खाण्यायोग्य राहत नाही. परिणामी, कुटार मिळणे कठीण झाले.

# पालकमंत्र्यांनी स्वीकारावे पुनर्वसित गावाचे पालकत्व! निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

अप्पर वर्धा प्रकल्पानंतर जिल्ह्यात सर्वात मोठ्या ठरू पाहणाऱ्या निम्न पेढी सिंचन प्रकल्पाची घळभरणी यंदाच्या जूनमध्ये प्रस्तावित असली तरी ती रखडलेल्या स्थलांतरणामुळे होणार की नाही, अशी शंका असताना सुसज्ज मूलभूत सुविधांसाठी पुन्हा एकदा प्रकल्पग्रस्तांनी एल्गार पुकारला आहे. त्यांनी शुक्रवारी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची सिंचन भवनात भेट घेतली. तथा पिण्याचे पाणी व पुनर्वसनस्थळी मूलभूत सुसज्ज सुविधा पुरविल्यानंतरच स्थलांतरण, अशी मागणी रेटून धरली. पालकमंत्र्यांनी अळणगाव या पुनर्वसित गावाचे पालकत्व स्वीकारावे, अशी आर्त हाकही दिली.

निम्न पेढी प्रकल्पाअंतर्गत अळणगाव या गावाचे पुनर्वसन अमरावतीलगतच्या कठोरा शिवारात करण्यात आले. मात्र या प्रकल्पाला जुन्या कायद्यानुसार मूलभूत सुविधा देय असल्याने प्रकल्पग्रस्तांची मानसिकता नकारात्मक होत चालली आहे. येथे बाभूळबन निर्माण झाले असून, पिण्याचे पाणीदेखील नाही. नाल्या बुजल्या आहेत. काही इमारती शिकस्त झाल्या आहेत. त्यामुळे आपण या गावाचे पालकत्व स्वीकारून या पुनर्वसित गावात विकासात्मक कामे करावीत व हे गाव राज्यभरातील पुनर्वसितांसाठी मॉडेल म्हणून उभे राहावे, अशी विनंती प्रकल्पग्रस्तांच्या वतीने आ. रवी राणा यांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे. यावेळी सरपंच गौतम खंडारे, सतीश मेटांगे, पंजाबराव दुर्गे, प्रवीण घोंगडे आदी उपस्थित होते.

**पाच गावे बुडीत क्षेत्रात**

निम्न पेढी प्रकल्पाअंतर्गत हातुर्णा, अळणगाव, गोपगव्हाण, कुंड खुर्द व कुंड सुर्जापूर ही पाच गावे पूर्णतः बुडीत क्षेत्रात आहे. त्यांचे पाच ठिकाणी पुनर्वसनासाठी जागादेखील देण्यात आली आहे. मात्र त्या पुनर्वसित पाचही गावांत मूलभूत सुविधांची वानवा असल्याने अद्यापपर्यंत पाचही गावातील सुमारे ४० टक्के कुटुंबांनी गावे सोडलेले नाही. त्यांचे स्थलांतरण अडल्याने परिणामी प्रकल्पाची घळभरणीदेखील थांबली आहे.

**अशा आहेत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या**

१) निम्न पेढी प्रकल्पातील एकूण १७६२ बाधित कुटुंबांना ८.२६ लाख रुपये प्रतिकुटुंब सानुग्रह अनुदान द्यावे.

२) निम्न पेढी प्रकल्पातील प्रत्येक कुटुंबाला सरसकट घरकुलाच्या लाभ देण्यात यावा, कुणालीही अपात्र ठरवू नये.

३) निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसन ज्या ठिकाणी मिळालेल्या भूखंडावरील ७/१२ बोझा हटवून कमी करून देण्यात यावा.

४) निम्न पेढी प्रकल्पातील ५२ शेतकऱ्यांना २ चा गुणक लागू करून फरकाची रक्कम देण्यात यावी.५) निम्न पेढी प्रकल्पातील पाचही गावांचे जलजीवन मिशनअंतर्गत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

**पुनर्वसन हवे दर्जेदार**

निम्न पेढी प्रकल्पातील पुनर्वसित गावात पेयजलाची व्यवस्था करावी. अंतर्गत रोडचे डांबरीकरण व बंधिस्त नालीचे बांधकाम, शासकीय इमारतींच्या दुरुस्तीसह नवीन इमारत बांधकाम करणे, खुले मात्र सरकारी भूखंडांना वॉल कंपाऊंड घालून तेथील स्वच्छता व सौंदर्यीकरण करणे, इलेक्ट्रिक पोलची दुरुस्ती करणे, स्ट्रीट लाइट बसवणे, डी. पी. दुरुस्तीची मागणीदेखील करण्यात आली.

# हायव्होल्टेज मॅच, शेकडो कोटींचा सट्टा, पाकिस्तानवर पैसे लावणारे बुडाले, विराट सट्टेबाजारात ठरला 'किंग'



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४नागपूर**

चॅम्पिअन्स ट्रॉफीत भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्यात अपेक्षेप्रमाणे विदर्भातूनच शेकडो कोटींचा सट्टा लागला. सामना सुरू होण्याच्या अगोदरच सट्टाबाजाराने भारताच्या विजयाचा अंदाज वर्तविला होता. पाकिस्तानच्या इनिंगमधील २८ ते ३३ ओव्हर्सदरम्यानचा कालावधी सोडला तर पूर्ण वेळ सट्टाबाजाराचा कल भारताकडेच होता. मात्र काही तरी वेगळे घडेल या आशेत ज्या सट्टेबाजांनी पाकिस्तानवर पैसे लावले त्यांना नुकसान सहन करावे लागले.

बुकींसाठी टीम इंडियाच पसंतीचा संघ होता. देशभरातील अनेक प्रमुख बुकींचे पंटर्स ऑनलाईन माध्यमांवरून सक्रिय झाले होते. सामना सुरू होण्याअगोदर मेन इन ब्लू संघाच्या बाजूने रुपयामागे ४७ पैसा व पाकिस्तानवर रुपयामागे १.९८ असा सट्टेबाजीचा दर होता.सामना सुरू झाल्यावर पाकिस्तानची सुरुवात संथ झाली. मात्र मोहम्मद रिझवान व शकील यांनी १०४ धावांची भागिदारी केल्याने सट्टाबाजाराचा अंदाज चुकतो की काय अशा पोस्ट सोशल माध्यमांवर सुरू झाल्या होत्या. त्यावेळेस पाकिस्तानवर पैसे लागण्यास सुरुवात झाली होती. मात्र ३४ व्या ओव्हरमध्ये रिझवानचा बळी गेल्यावर परत जैसे थे चित्र झाले.अखेरपर्यंत खेळाडूंचे वैयक्तिक स्कोअर, पाकिस्तानच्या गोलंदाजांचे बळी यावर लगवाडी-खायवाडी सुरू होती.

**ऑनलाईन लगवाडी-खायवाडीवर भर**

नागपूर पोलिसांनी, विशेषतः गुन्हे शाखेने, बेकायदेशीर सट्टेबाजीच्या कारवायांवर कारवाई करण्यासाठी त्यांची दक्षता वाढवली होती. सामन्यादरम्यान संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांनी व्यापक योजना आखली होती. बहुतांश सट्टेबाजी विविध प्सच्या माध्यमावर चालते व त्यांचे आकडे सोशल माध्यमांवर व्हायरल होतात. अनेकांनी बेटिंग प्सच्या माध्यमातून भारतावर पैसे लावले होते. काही संकेतस्थळावरूनदेखील हा प्रकार सुरू होता. त्याकडेदेखील पोलिसांचे लक्ष होते.

# १०२ रुग्णवाहिका वाहन चालक संघटनेचे बेमुदत कामबंद उपोषण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४अमरावती**

१०२ रुग्णवाहिका वाहन चालक संघटना,जिल्हा शाखा,अमरावती च्या वतीने सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी आपल्या विविध प्रकारच्या मागाण्यांना घेऊन बेमुदत कामबंद उपोषण आंदोलन सुरू करण्यात आले. तदपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक २० फेब्रुवारी २०२५ रोजी संबंधित संघटना चे वतीने निवेदन सादर करण्यात आले. सोमवारी आपल्या एकजुटीचा परिचय करून देत १०२ रुग्णवाहिका चालकांनी त्यांच्या थकीत मानधनाबाबत व भविष्य निर्वाह निधी चा मुद्दा उपस्थित करून आपल्या बेमुदत कामबंद उपोषणाला सुरुवात केली. अमरावती जिल्हामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी १०२ रुग्णवाहिका चालक म्हणून कार्यरत असलेल्या या सर्व सहकाऱ्यांनी भर उन्हात आपल्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी बेमुदत कामबंद उपोषणाला बसले आहे.

# एक रुपयाही मानधन वाढवून मागितले नाही; सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवईंनी दिला आठवणींना उजाळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२४अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा ४१ वा दीक्षांत समारंभ रविवारी पार पडला. या समारंभाला राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई उपस्थित होते. भूषण गवई यांनी आपल्या भाषणात जुन्या आठवणींना उजाळा दिला. संत गाडगेबाबा आणि दिवंगत नेते रा. सु. गवई यांच्या निकटच्या संबंधांविषयी भाष्य केले. सोबतच विद्यापीठासोबत असलेल्या ऋणानुबंधाविषयी देखील भावना व्यक्त केल्या. न्यायमूर्ती भूषण गवई म्हणाले, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि माझा नजीकचा संबंध आहे.

१९९२ ते २००३ पर्यंत मी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश होईपर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा वकील म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. विद्यापीठाविषयी असलेल्या आत्मियतेमुळे मी या कालावधीत एक रुपयाही मानधन वाढवून मागितले नाही, याचा मला आनंद आहे.भूषण गवई म्हणाले, संत गाडगेबाबा आणि माझे वडील रा. सू. गवई यांच्यात नजीकचा संबंध होता. रा. सू. गवई हे विद्यार्थी असताना संत गाडगेबाबा हे त्यांना अनेकवेळा सोबत प्रवचनाला घेऊन जात होते. प्रवचनाच्या आधी त्यांना ते भाषण करायला सांगायचे. माझ्या वडिलांच्या



राजकीय आणि सामाजिक कार्याच्या पायाभरणीत गाडगेबाबांचे मोलाचे योगदान आहे. रा.सू गवई यांच्या भव्य स्मारक विद्यापीठाच्या नजीकच उभारले जात आहे. तेथील सुविधांचा वापर विद्यापीठाला करता येऊ शकेल.

भूषण गवई म्हणाले, स्वतःची प्रगती साधत असताना सभोवताली जे अभावग्रस्त आहेत, त्यांना मदत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. समाजासाठी सकारात्मक योगदान देणे, ही तुमची प्राथमिक जबाबदारी आहे. समाजात अन्यायाविरूद्ध आवाज उठवणे ही सुशिक्षित लोकांची जबाबदारी आहे. त्यासाठी जीवनात मूल्यांचे आचरण करणे आवश्यक ठरते. मूल्यशिक्षण हे केवळ शैक्षणिक प्रगतीसाठी नाही, तर तुमच्या व्यक्तिमत्वाच्या समृद्धीसाठी महत्वाचे आहे. मूल्य शिक्षणाने नैतिकता निर्माण होते.

शिक्षणाने तुम्हाला प्रामाणिक आणि जबाबदार नागरिक बनविले आहे. शिक्षणाचा उपयोग समाजाच्या भल्यासाठी व्हावा, ही सामाजिक बांधिलकीची जाणिव महत्वाची आहे. शिक्षण तुम्हाला समाजात परिवर्तन घडविणारे नेते बनवते. संत गाडगेबाबा म्हणत असत, की माणसात माणुसकी हवी, तेव्हाच समाज प्रगती करेल. माणूसधर्म म्हणजे काय, हे तुम्ही अवगत करून घेतले पाहिजे. त्यादृष्टीने सतत वाचन करणे गरजेचे आहे. चांगली पुस्तके वाचली पाहिजेत.